**बिसेन डेन्टल केअर**

डॉ.दिप(पंकज) बिसेन — डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ

बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया

सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर व साठवणे एजंसी जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१६ गोंदिया | अंक ३९ | बुधवार, दि.०२ ते ०८ सप्टेंबर २०२६ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027


# पार्किंगच्या मुळावर 'दुकानगाळे' उठवण्याचा बालहट्ट कुणाचा?

# गोंदिया पंचायत समितीत विनापरवानगी बेकायदेशीर बांधकामाचा सपाटा!

## जि.प.च्या आर्थिक गैरव्यवहारानंतर आता पं.स.चाही 'पैसा कमावण्याचा' नवा फंडा? अधिकाऱ्यांचे अज्ञान अन् लोकप्रतिनिधींचे मौन!

**गोंदिया:**–गोंदिया जिल्हा परिषदेच्या वतीने पंचायत समितीच्या आवारात उभारण्यात आलेल्या जुन्या दुकान गाळ्यांच्या वाटपात लाखो रुपयांचा ममलई मारण्याचाफ प्रकार अद्याप ताजा असतानाच, आता पुन्हा त्याच परिसरात नियम धाब्यावर बसवून बेकायदेशीर दुकान गाळ्यांचे काम हाती घेण्यात आले आहे. जि.प. बांधकाम विभागाची कोणतीही परवानगी न घेता सुरू असलेल्या या बांधकामामुळे पंचायत समिती परिसरातील उरलीसुरली पार्किंगची जागाही नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. जि.प. पदाधिकाऱ्यांनी गाळे विकून पैसे कमावले, मग आपण तरी का मागे राहावे? याच सूत्रावर हा संपूर्ण खेळ सुरू असल्याची खमंग चर्चा सध्या जिल्ह्यात रंगली आहे.



### बेरोजगारांना डावलून ३०-४० लाखांची वसुली!

**काही महिन्यांपूर्वी जिल्हा परिषदेने पं.स. आवारात दुकान गाळे उभारले होते. या गाळ्यांचे वाटप करताना स्थानिक बेरोजगारांना वाऱ्यावर सोडत, मर्जीतील धनदांडग्यांना प्रत्येकी ३० ते ४० लाख रुपयांना गाळे दिल्याचे गंभीर आरोप खुद्द पंचायत समितीच्या सभापती, उपसभापती आणि सदस्यांनीच पत्रकार परिषद घेऊन केले होते. या आर्थिक गैरव्यवहाराची धूळ अजून खाली बसलेली नसतानाच, आता पुन्हा त्याच आवारात नवीन दुकान गाळ्यांचे बांधकाम सुरू झाल्याने नागरिक अवाक झाले आहेत.**

### वाहतुकीची कोंडी आणि 'पार्किंग'चा फज्जा!

**नवीन बांधकामामुळे पंचायत समितीच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळील अर्धीहून अधिक जागा गिळंकृत केली जात आहे. आधीच जागेअभावी पंचायत समितीत येणारे ग्रामसेवक, विस्तार अधिकारी, सरपंच, ग्रामपंचायत पदाधिकारी, कर्मचारी आणि सामान्य नागरिकांना वाहने ठेवायला जागा उरलेली नाही. त्यामुळे मुख्य रस्त्यावरच दुचाकी उभ्या कराव्या लागत असून रोज मोठ्या प्रमाणावर वाहतुकीचा फज्जा उडत आहे. पार्किंगच्या जागेवर दुकानगाळे थाटण्याचा हा नेमका कुणाचा मबालहट्टफआहे, असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.**

### अधिकाऱ्यांना 'माहिती नाही', तर लोकप्रतिनिधींचे 'मौन'!

**विशेष म्हणजे या बेकायदेशीर बांधकामाबाबत जेव्हा जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना विचारणा करण्यात आली, तेव्हा त्यांनी "आपल्याला काहीच माहिती नाही" असे सांगून हात वर केले. दुसरीकडे बांधकाम सभापतींनी तर या विषयावर पूर्णपणे ममौनफ बाळगल्याने नवल व्यक्त केले जात आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांचे हे अज्ञान आणि लोकप्रतिनिधींचे मौन पाहता, गोंदिया जिल्हा परिषदेत नक्की कुणाचा वचक उरला आहे की नाही, असा सवाल उपस्थित होत आहे. हे नियमबाह्य बांधकाम तत्काळ न थांबल्यास मोठ्या आंदोलनाचा भडका उडण्याची शक्यता वर्तवली जात आहे.**

# ग्रामसभेच्यावेळी पोलीस बंदोबस्त व सरंक्षणाकरीता ग्रा.पं.अधिकाऱ्यांचे आंदोलन




**गोंदिया** :–जबदलत्या डिजिटल युगाचा विचार करता ग्रामसभांची संख्या मर्यादित करून वर्षातून केवळ एकच संवैधानिक ग्रामसभा घेण्यात यावी, ऐन वेळच्या विषयांवर कायदेशीर बंदी घालावी आणि प्रत्येक ग्रामसभेला विनामूल्य व अनिवार्य पोलीस बंदोबस्त देण्यात यावा, या प्रमुख मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियन (डीएनए १३६) जिल्हा शाखा, गोंदियाच्या वतीने गोंदिया जिल्हा परिषदेसमोर भव्य धरणे आंदोलन व मोर्चा काढण्यात आला. या आंदोलनात जिल्ह्यातील तब्बल ३०० हून अधिक नियमित व कंत्राटी ग्रामपंचायत अधिकारी आणि महिला भगिनींनी एकत्र येत प्रशासकीय अन्यायाविरुद्ध एल्गार पुकारला.

जळगाव जिल्ह्यातील पारोळा तालुक्यातील शिवरे येथे ग्रामसभेत शासकीय कर्तव्य बजावत असताना ग्रामसेवक प्रल्हाद पाटील यांच्यावर काही समाजकंटकांकडून अमानुष मारहाण करण्यात आली, ज्यामध्ये त्यांचा अत्यंत दुर्दैवी मृत्यू झाला. या संतापजनक कृत्याचा तीव्र निषेध करण्यासाठी संपूर्ण राज्यभर एकाच दिवशी हे आंदोलन आयोजित केले आहे. या घटनेमुळे कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड भीतीचे व मानसिक तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, या पार्श्वभूमिवर आज संबंधित विभागाची रीतसर पूर्वपरवानगी घेऊन अत्यंत शांततापूर्ण व कायदेशीर मार्गाने हे भव्य आंदोलन छेडण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाध्यक्ष कमलेश बिसेन यांनी ग्रामीण भागातील सद्यस्थितीवर तीव्र चिंता व्यक्त केली. ते म्हणाले, ङ्गआज ग्रामीण भागात काम करताना ग्रामपंचायत अधिकाऱ्यांचे मानसिक आरोग्य आणि सुरक्षा पूर्णपणे धोक्यात आली आहे. डिजिटल युगामध्ये शासकीय योजनांचा प्रचार करण्यासाठी आधुनिक साधने व लाभार्थी निवडीसाठी पारदर्शक ऑनलाईन पोर्टल उपलब्ध असतानाही, केवळ त्रास देण्याच्या हेतूने ग्रामसभेत ऐन वेळी ५ वर्षांचे जुने जमाखर्च मागून लोकप्रतिनिधी व कर्मचाऱ्यांवर कायदेबाह्य दबाव निर्माण केला जातो. ही विपरीत परिस्थिति आता सहन करण्याच्या पलीकडे गेली आहे. शासनाने कर्मचाऱ्यांना तात्काळ कायदेशीर व पोलीस संरक्षण दिले पाहिजे.

या जाहीर सभेच्या सांगतेनंतर जिल्हा परिषद कार्यालय ते जिल्हाधिकारी कार्यालय या मार्गान भव्य निषेध मोर्चा काढण्यात आला. आंदोलन संपल्यानंतर जिल्हाधिकारी, गोंदिया आणि मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद गोंदिया यांच्या माध्यमातून राज्याचे ग्रामविकास मंत्री ना. जयकुमार गोरे आणि प्रधान सचिव यांना मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात वर्षाला किमान ४ ग्रामसभांची अट रद्द करून ती वर्षातून किमान १ करावी किंवा ग्रामसभा पूर्णपणे नगर पंचायत प्रमाणे बंद करण्यात याव्यात निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधी द्वारे कामकाज शक्य आहे, ग्रामसभा चालवण्यासाठी कडक नियमावली तयार करून प्रत्येक ग्रामसभेला अनिवार्य पोलीस संरक्षण देण्यात यावे या मागण्यांचा समावेश आहे.

आंदोलनात आंदोलनात संघटनेचे मुख्य नेतृत्व जिल्हाध्यक्ष कमलेश बिसेन, जिल्हा सरचिटणीस कुलदिप कापगते यांनी केले. आंदोलनात लीलाधर पाथोड़े निमंत्रण मध्यवर्ती सरकारी कर्मचारी महासंघ, पी जी शहारे जिल्हा परिषद महासंघ,रमेश नामपल्लीवार ,सचिन कुथे ,सौ. भारती वाघमारे,शैलेष परिहार,योगेश रूद्रकार, योगराज बिसेन, रजनी शहारे ,रामेश्वर जमईवार ,रितेश शहारे,सुरेश वाघमारे,टिकाराम जनबंधु,प्रदिप ठाकरे ,किशोर आचले ,नरेंद्र गोमाशे,कु. नम्रता रंगारी सर्व प्रमुख जिल्हा पदाधिकाऱ्यांसह सर्व तालुक्यांचे अध्यक्ष, सचिव, नियमित व कंत्राटी ग्रामपंचायत अधिकारी आणि महिला कर्मचारी मोठ्या संख्येने फलक हाती घेऊन सहभागी झाले होते.

# रेल्वे अंडरपासच्या छतातून गळतेय पाणी



**गोंदिया:**– हावडा–मुंबई रेल्वे मार्गावरील गोंदिया शहरातील बाजार विभाग आणि रामनगर या दोन भागांना जोडणाऱ्या रेल्वे अंडरपासच्या छतातून गेल्या अनेक महिन्यांपासून पाणी गळत आहे. त्यामुळे या मार्गावरून ये–जा करणाऱ्या वाहनचालकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. समस्या कायम असतानाही रेल्वे प्रशासनाकडून याकडे गांभीर्याने लक्ष दिले जात नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. शहरातील बाजार विभाग आणि रामनगर हे रेल्वे मार्गामुळे दोन भागात विभागले आहेत. या दोन्ही भागांना जोडण्यासाठी हावडा मुंबई रेल्वे मार्गावर भुयारी मार्गाची सुविधा करण्यात आली. या मार्गावरून दिवसरात्र मोठ्या प्रमाणात नागरिक व वाहनांची वर्दळ असते. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून अंडरपासच्या छतातील विविध ठिकाणांहून पाण्याची गळती सुरू आहे.

पावसाळ्यात ही समस्या अधिक गंभीर होत असून, छतातून ठिकठिकाणी पाणी टपकत असल्याने मार्गावरून जाणाऱ्या नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. ओलसरपणामुळे छताचा काही कमकुवत होण्याची शक्यताही व्यक्त केली भाग जात आहे.

यापूर्वी अंडरपासच्या छताचा काही भाग कोसळल्याचेही सांगण्यात येत आहे. त्यामुळे भविष्यात मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी रेल्वे प्रशासनाने या समस्येकडे तातडीने लक्ष देण्याची गरज आहे. छताची तांत्रिक तपासणी करून पाणी गळतीची कारणे शोधावीत आणि आवश्यक ती दुरुस्ती करावी,अशी मागणी नागरिकांनी केली. या अंडरपासमधून २४ तास वाहतूक सुरू असल्याने कोणताही अनुचित प्रकार घडल्यास त्याची गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे रेल्वे प्रशासनाने केवळ तात्पुरती डागडुजी न करता अंडरपासची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली.

### धोकादायक अवस्थेची खासदारांनी घेतली दखल

रेल्वे अंडरपासच्या धोकादायक अवस्थेची दखल घेत खासदार राजेंद्र जैन यांनी दक्षिण पूर्व मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक तरुण प्रकाश यांना पत्र पाठविले आहे. अंडरपासच्या छतातून पाणी गळत असून, यापूर्वी छत कोसळण्याच्या घटनाही घडल्या आहेत. तक्रारी करूनही उपाययोजना झाल्या नसल्याने तातडीने दुरुस्ती करून सुरक्षितता सुनिश्चित करण्याची मागणी त्यांनी केली.

### कुपोषणमुक्त आणि सुदृढ आरोग्यासाठी संतुलित आहाराचा अंगीकार करा-डॉ.गोल्हार

**गोंदिया:**उत्तम आरोग्य हीच खरी संपत्ती असून, त्याची सुरुवात आपल्या रोजच्या आहारातून होते. शरीराच्या योग्य वाढीसाठी आणि आजारांपासून दूर राहण्यासाठी पोषणयुक्त संतुलित आहार घेणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभिजीत गोल्हार यांनी केले. दरवर्षी १ ते ७ सप्टेंबर दरम्यान साजरा होणाऱ्या मराष्ट्रीय पोषण सप्ताहाफच्या निमित्ताने त्यांनी सर्व गोंदियावासीयांना कुपोषणमुक्त व सुदृढ आरोग्यासाठी संतुलित आहाराचा अंगीकार करण्याचे आवाहन केले आहे.

जिल्ह्याने आरोग्य निर्देशांकात राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. हाच आरोग्याचा उच्च दर्जा कायम राखण्यासाठी आणि कुपोषण निर्मूलनासाठी नागरिकांनी आपल्या खाण्यापिण्याच्या सवयींमध्ये सकारात्मक बदल करणे अत्यंत आवश्यक असल्याचे डॉ. गोल्हार यांनी नमूद केले.

बाहेरील जंक फूड, अति प्रमाणात तळलेले पदार्थ, अतिरिक्त साखर आणि मिठाचा वापर टाळून घरच्या ताज्या आणि सकस अन्नाला प्राधान्य द्यावे.रोजच्या जेवणामध्ये हिरव्या पालेभाज्या, हंगामी फळे, तृणधान्ये, डाळी आणि दुग्धजन्य पदार्थांचा नियमित समावेश करावा.गरोदर महिला, स्तनदा माता, वयोवृद्ध आणि लहान मुलांच्या पोषणाकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. बालकांच्या योग्य शारीरिक व मानसिक विकासासाठी लोहयुक्त आहाराचे महत्त्व मोठे आहे.विविध आजारांपासून बचाव करण्यासाठी केवळ चांगला आहारच नाही, तर शुद्ध पाणी पिणे आणि वैयक्तिक स्वच्छता राखणे तितकेच महत्त्वाचे आहे.

एक सशक्त कुटुंब आणि निरोगी समाज घडवण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आजपासूनच आपल्या आहारात छोटे पण पोषक बदल करावेत, असे आवाहन डॉ. वाघमारे यांनी केले. या पोषण सप्ताहाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि उपकेंद्रांच्या माध्यमातून विविध जनजागृती कार्यक्रम राबवले

# गोंदिया-बालाघाट मार्गावरील कटंगी नाक्यावर ७ सप्टेंबरला रस्ता रोको

## गुदमा–प्रतापबाग रेल्वे लाईन भूसंपादनाविरोधात संताप



**गोंदिया:**–:हावडा–मुंबई रेल्वे मार्गावरून गुदमा ते प्रतापबाग मार्गे जबलपूर रेल्वे मार्गाला जोडणाऱ्या नवीन बायपास रेल्वे लाईनसाठी सुरू असलेल्या भूसंपादनाविरोधात भूधारकांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. रेल्वे प्रशासनाकडून मिळणारी भरपाई ही अत्यंत तुटपुंजी असून ती सध्याच्या बाजारभावाच्या तुलनेत अवघी १० टक्केच असल्याचा आरोप बाधित जमीन मालकांनी केला आहे. या अन्यायाविरोधात ७ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता गोंदिया–बालाघाट मार्गावरील कटंगी नाक्यावर शेकडो भूधारकांनी मरस्ता रोकोफ आंदोलन करण्याची घोषणा केली आहे.

गेल्या दोन–तीन वर्षांत परिसरात जमिनींचे खरेदी–विक्रीचे व्यवहार अनेक पटीने वाढले असताना, रेल्वे विभाग मात्र जुन्या व अपुऱ्या दराने भूसंपादन करत आहे. त्यामुळे संतप्त झालेल्या १५० हून अधिक भूधारकांनी २९ ऑगस्ट रोजी कटंगी येथील मयूर लॉन येथे बैठक घेऊन आंदोलनासंदर्भात भूमिका घेण्याचा निर्णय घेतला.

आंदोलनकर्ते शेतकरी अखिलेश सेठ यांनी दिलेल्या माहितीनुसारङ्गगुदमा, गोंदिया खुर्द, खमारी, दागाँटोला, चुल्हाद, दातोरा, हल्बीटोला, धीवारी, चांदणीटोला, लोधीटोला, कटंगी कला व नागरा या गावांतील ज्यांची शेती, घरे, प्लॉट्स व दुकानांची जागा या प्रकल्पात जात आहे, ते सर्व बाधित या बैठकीस उपस्थित होते. प्रशासनाला निवेदन देऊनही दुर्लक्ष झाल्यास भविष्यात मरेल रोकोफ सह तीव्र आंदोलन छेडले जाईल व नवीन रेल्वे लाईनचे काम करू दिले जाणार नाही, असा इशारा देण्यात आला आहे.

या बैठकीला कार्तिक चौहान, सूरज बावनकर, सुप्रीत बैस, राजू छत्रेकर, राजू बिसेन, राधाकृष्ण ठाकूर, चूटे गुरुजी, अय्यूब शेख, जितेंद्र लिल्हारे, गजेंद्र कवास, धीरेंद्र पटेल यांच्यासह शेकडो शेतकरी व भूधारक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बाधित भूधारकांच्या प्रमुख मागण्या

**भूसंपादनाचा मोबदला सध्याच्या दरापेक्षा ५ पटीने वाढवून मिळावा.बाधित कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरी द्यावी. ३० मीटरपर्यंत अतिरिक्त मोबदला व आवागमनासाठी रस्ता तयार करून द्यावा.**

# शासकीय,निमशासकीय बैठक,कार्यक्रम,उपहारगृहात आरोग्यदायी अन्नपदार्थ,संतुलित मेनू बंधनकारक

**मुंबई**–शासकीय, निमशासकीय बैठका, शासकीय कार्यक्रम व उपहारगृहात आरोग्यदायी अल्पोपहार आणि जेवण उपलब्ध करून देण्याचा आणि तशाच पद्धतीचा मेनू ठेवणे बंधनकारक करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना बैठका, कार्यक्रम आणि प्रशिक्षणाच्या वेळी संतुलित व पौष्टिक आहार उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येणार आहे. आरोग्यदायी जीवनशैली आणि पोषक आहाराची सवय ही शासकीय कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन जीवनाचा भाग व्हावी, या उद्देशाने सर्व विभागांना कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येणार आहेत.बैठका, कार्यक्रम, प्रशिक्षण संस्था, परिषदा तसेच उपहारगृहांमध्ये अल्पोपहार अथवा भोजन देताना आरोग्यदायी पर्यायांचा समावेश करण्यात येणार आहे. यामध्ये हंगामी फळे, केळी, सफरचंद, पेरू, पपई यांसारखी फळे, उकडलेली अंडी, उकडलेले कडधान्य, पोहे, इडली–सांबार, मागणीनुसार गरम दूध, साखरविरहित ग्रीन टी, नाचणीची भाकरी, ज्वारी–बाजरीची भाकरी, ताक, कोशिंबीर, विविध भाज्या, डाळी व उसळी यांसारख्या पौष्टिक पदार्थांना प्राधान्य देण्यात येणार आहे.

अल्पोपहारामध्ये तेलकट व अति–प्रक्रिया केलेल्या खाद्यपदार्थांचे प्रमाण कमी करण्याबरोबरच पौष्टिक घटक असलेल्या स्थानिक व पारंपरिक खाद्यपदार्थांना प्रोत्साहन देण्यात येणार आहे. जेवणामध्ये डाळ, उसळ, पालेभाज्या, ताक, कोशिंबीर, भाजी आणि आवश्यकतेनुसार संतुलित धान्यांचा समावेश करण्याची सूचना करण्यात आली आहे.




संबंधित कार्यालयांच्या नवीन खानपान (केटरिंग) करारामध्ये आरोग्यदायी मेनूचा समावेश करणे बंधनकारक करण्यात येणार आहे. या निर्णयाची योग्य अंमलबजावणी करण्यापूर्वी संबंधित शासकीय तसेच निमशासकीय संस्थांनी आपल्या कर्मचाऱ्यांशी आरोग्यविषयक भूमिकेबाबत चर्चा करावी, अशाही सूचना देण्यात आल्या आहेत.

शासकीय व निमशासकीय संस्थांनी आपल्या कर्मचाऱ्यांमध्ये आरोग्यदायी जीवनशैली आणि पौष्टिक आहाराबाबत आवश्यक जनजागृती करावी तसेच संतुलित आहाराचे मेनू उपलब्ध करून देण्यासाठी मार्गदर्शक सूचना तयार कराव्यात. आरोग्यदायी मेनू निश्चित करताना खउचठ–छखछ यांच्या मार्गदर्शक तत्त्वांचा उपयोग करता येणार आहे.

मंत्रालयातील उपहारगृहात सध्या फळे, उकडलेली अंडी, उकडलेले कडधान्य, पोहे, इडली–सांबार, गरम दूध आणि ग्रीन टी यांसारखे आरोग्यदायी पदार्थ उपलब्ध करून देण्यास सुरुवात करण्यात आली आहे. त्यामुळे अल्पोपहारातील तेलकट खाद्यपदार्थांचे प्रमाण कमी करण्यास मदत झाली असून, डाळ, उसळ, पालेभाजी, ताक, कोशिंबीर, पुलाव यांसारख्या पौष्टिक पदार्थांचाही जेवणात समावेश करण्यात येत आहे.

# केवळ १० मीटरसाठी रुग्णवाहिकेलाही मारावा लागतोय १० किमीचा वेढा



गोरेगाव– तालुक्यातील कुर्हाडी जिल्हा परिषद क्षेत्रांतर्गत येत असलेल्या कुहाडी–मेंगाटोला–बाघोली मार्गावरील पुलाचे काम गेल्या अनेक दिवसांपासून अपूर्ण अवस्थेत असल्यामुळे परिसरातील ग्रामस्थांना अडचणीचा सामना स्थानिक प्रशासन आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्षामुळे सहन करण्याची वेळ आली आहे. यामुळे परिसरातील अनेक गावांचा मुख्य मार्गाशी असणारा संपर्क पूर्णपणे तुटला आहे. सद्यस्थितीत वाहनधारकांना १० मीटर अंतर पार करण्यासाठी सुमारे १० किलोमीटरचा लांबचा फेरा मारुन जावे लागत आहे. इतकेच नाही तर आपत्कालीन परिस्थितीत धावणाऱ्या रुग्णवाहिकेलाही या समस्येचा सामना करावा लागत आहे. यासंदर्भात प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही अधिकारी लक्ष देत नसल्याचा आरोप स्थानिक लोकप्रतिनिधींनी केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कुर्हाडी जिल्हा परिषद क्षेत्रांतर्गत येणाऱ्या कुर्हाडी–मेंगाटोला–मरारटोला–बाघोली–सिलेगाव मार्गावरील पुलाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्यावतीने गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू आहे. पावसाळ्यापूर्वी हे काम पूर्ण करणे आवश्यक होते. मात्र,कंत्राटदाराच्या संथ कारभारामुळे पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण होऊ शकले नाही. पुलाचे बांधकाम पूर्ण झाले असले तरी जोड रस्त्याचे काही काम अजूनही बाकी आहे. त्यामुळे गेल्या २० दिवसांपासून या मार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे. १० मीटरचे अंतर पार करण्यासाठी १० किलोमीटरचा अतिरिक्त फेरा मारावा लागत असल्याने शालेय विद्यार्थी आणि रुग्णवाहिकेची मोठी कोंडी होत आहे.

### अन्यथा जनआंदोलनाचा इशारा

**"पुलाचे काम पूर्ण न झाल्याने या भागातील अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. वाहनधारकांना नाइलाजाने लांबच्या मार्गाने प्रवास करावा लागत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना वारंवार सांगूनही याकडे दुर्लक्ष केले जात आहे. येत्या चार दिवसांत हा मार्ग सुरू न झाल्यास तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल."असा इशारा जिल्हा परिषद सदस्य शैलेश नंदेश्वर यांनी दिला आहे.**

# १ लाख ६० हजार मतदार घटले; प्रारुप यादीत ११ लाख ६३ हजार !

**गोंदिया :–** भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत (एसआयआर) गोंदिया जिल्ह्याची प्रारूप मतदार यादी सोमवारी (दि. ३१) प्रसिद्ध करण्यात आली. या यादीत जिल्ह्यातील एकूण ११,२३,८०५ मतदारांचा समावेश होता.

एसआयआर मोहीमे अंतर्गत विविध कारणांनी १ लाख ६० हजार ६४६ मतदारांना या यादीतून वगळून स्वतंत्र यादीत ठेवण्यात आले आहे. आक्षेप व हरकतीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर या मतदारांना यातून कायमस्वरुपी वगळले जाणार आहे. त्यामुळे मतदारांची संख्या कमी होणार असली तरी मतदानाचा टक्का मात्र निश्चित वाढणार आहे.

जिल्ह्यात लोकसभा, विधानसभा, जिल्हा परिषद निवडणुकीत मतदानाची टक्केवारी ही जवळपास ७५ टक्के असते. पण बऱ्याच कालावधीपासून मतदार याद्यांचे पुनर्निरीक्षण न झाल्याने त्यात मृतक, स्थलांतरित, कायम स्वरुपी स्थलांतरित, दुबार नाव असलेल्या मतदारांचा सुध्दा समावेश होता. त्यामुळे याचा थेट परिणाम हा मतदानाच्या टक्केवारीवर होत होता. पण आता एसआयआरमुळे ही सर्व वगळली जाणार असल्याने मूळ मतदारांची संख्या कायम राहणार असून यामुळे मतदानाची टक्केवारी निश्चित वाढण्यास मदत होणार आहे. एसआयआर कार्यक्रमांतर्गत गोंदिया जिल्ह्याची प्रारूप मतदार यादी सोमवारी प्रसिद्ध करण्यात आली आहे. या यादीत जिल्ह्यातील एकूण ११,२३,८०५ मतदारांचा समावेश असून नागरिकांनी आपले नाव तपासून आवश्यक दावे व हरकती ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत सादर कराव्यात, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी मंदार पत्की यांनी राजकीय पक्षाच्या आयोजित बैठकीत केले.



### ४ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध होणार अंतिम मतदार यादी

**३१ ऑगस्ट रोजी प्रारूप मतदार यादी जाहीर झाली. यानंतर ३० सप्टेंबरपर्यंत दावे हरकती स्वीकारले जाणार आहेत. त्यानंतर ४ नोव्हेंबर रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे.**

### ६७ हजार मतदारांच्या नावांमध्ये विसंगती

**विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेदरम्यान मृत, कायमस्वरूपी स्थलांतरित, पत्ता न सापडलेले, दुबार किंवा अन्य ठिकाणी नोंद असलेले असे १,६०,६४६ (१४.२९ टक्के) मतदार स्वतंत्र यादीत समाविष्ट करण्यात आले आहेत. विशेष म्हणजे तब्बल ६७ हजार १९७ मतदारांच्या नावांमध्ये विसंगती आढळून आली आहे.**

### ३० सप्टेंबरपर्यंत करता येणार दावे हरकती

**प्रारूप मतदार यादी जिल्हास्तरावर तसेच सर्व मतदाना केंद्रांवर प्रसिद्ध करण्यात आली आहे. यासंदर्भात सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची बैठक पार पडली. ३१ ऑगस्ट ३० सप्टेंबर कालावधीत मतदार यादीबाबतचे दावे व हरकती संबंधित मतदार नोंदणी अधिकारी किंवा मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याकडे सादर करता येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. नागरिकांना आपले नाव यादीत तपासून आवश्यक दावे व हरकती ३० सप्टेंबरपर्यंत संबंधित निवडणूक अधिकाऱ्यांकडे सादर कराव्यात, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी मंदार पत्की यांनी केले आहे.**

## संपादकीय

### जागे व्हा, जबाबदार व्हा! आपल्या गावची शाळा वाचवणे हीच खरी नैतिक जबाबदारी

आज आपल्या ग्रामीण आणि शहरी भागातील शासकीय प्राथमिक व माध्यमिक शाळा एका अत्यंत बिकट आणि गंभीर वळणावर उभ्या आहेत. ज्या शाळांनी एकेकाळी देशातील अनेक आयएएस, आयपीएस अधिकारी, शास्त्रज्ञ, राजकीय नेते आणि नामांकित उद्योजक घडवले, त्याच शाळा आज प्रशासकीय दुर्लक्ष आणि खाजगीकरणाच्या महापूरात आपले अस्तित्व टिकवण्यासाठी झगडत आहेत. गळणारी छत, स्वच्छतागृहांची दैनावस्था, पिण्याच्या पाण्याची दडपण आणणारी कमतरता, बंद पडलेले डिजिटल वर्ग आणि खेळाच्या साहित्याचा अभाव यांमुळे गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबांतील हजारो मुलांचे भवितव्य अंधारात ढकलले जात आहे.

खाजगी शाळांच्या चकचकीत आमिषांमुळे आज गावच्या शाळांमध्ये पटसंख्या घटत असून, अनेक शाळांना टाळे लागण्याची वेळ आली आहे. परंतु, ही वेळ केवळ सरकारला दोष देत बसण्याची किंवा शिक्षकांशी वाद घालत बसण्याची मुळीच नाही. आज महाराष्ट्रातील सुशिक्षित, संवेदनशील आणि परिवर्तनवादी तरुणाईला नम्र, पण ठाम आवाहन करण्याची वेळ आली आहे कि आपल्या गावची शाळा वाचवणे, ही आपली नैतिक जबाबदारी आहे.

तरुणांनी आता केवळ प्रेक्षक न राहता प्रत्यक्ष कृतीची धुरा हाती घेतली पाहिजे. सर्वप्रथम आपल्या गावच्या शाळेला भेट देऊन तिथल्या समस्या, मध्यान्ह भोजनाचा दर्जा, पिण्याचे पाणी आणि डिजिटल साधनांची शांततेत पाहणी करा. मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख आणि शिक्षकांशी संघर्ष न करता सहकार्याची भूमिका ठेवून संवाद साधा. शाळा व्यवस्थापन समिती (SMC) सक्रिय करून गावकऱ्यांच्या मदतीने समस्यांची यादी तयार करा.

प्रशासकीय पातळीवर गट शिक्षण अधिकारी (BEO) आणि गट विकास अधिकारी (BDO) यांच्याकडे शाळांच्या त्रुटी दूर करण्यासाठी नियमित पाठपुरावा करा. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, आपल्या स्थानिक लोकप्रतिनिधींना मग तो सरपंच असो, पंचायत समिती किंवा जिल्हा परिषद सदस्य असो, किंवा आमदार उत्तरदायी बनवा. सभ्य आणि ठाम भाषेत त्यांच्याकडून शाळेच्या सुधारणेसाठी निधी मंजूर करून घ्या. ग्रामसभांमध्ये शाळेच्या भौतिक व शैक्षणिक गुणवत्तेचा मुद्दा अग्रक्रमाने मांडून गावकऱ्यांचा लोकसहभाग वाढवणे गरजेचे आहे.

आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर करत आपल्या गावची शाळा स्वच्छ, सुंदर आणि गुणवत्तेने परिपूर्ण बनवणे हेच आपले मुख्य ध्येय असायला हवे. तरुणाईच्या अथांग ऊर्जेने आणि सामूहिक प्रयत्नांनीच शासकीय शाळांचा भूतकाळात असलेला सुवर्णकाळ पुन्हा आणता येऊ शकतो. चला, एकत्र येऊ या; तक्रारींची भाषा सोडून कर्तव्याची वाट धरू या आणि आपल्या गावचे बालपण अन् शिक्षणाचा पाया वाचवू या!

## "शहरी नक्षल" ते "दिमागी नक्षल" : शब्द बदलला ,असहमतीकडे पाहण्याची दृष्टी बदलली का ?

नक्षलवादाचा हिंसक चेहरा देशासाठी निश्चितच घातक आहे आणि त्याचा कठोरपणे बंदोबस्त झालाच पाहिजे; मात्र सरकारच्या धोरणांवर प्रश्न विचारणे, अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे किंवा शांततापूर्ण आंदोलन करणे याला नक्षलवादाचे स्वरूप देणे लोकशाहीसाठी धोकादायक आहे. "शहरी नक्षल' असो वा "दिमागी नक्षल', एखाद्या व्यक्तीला राजकीय लेबल लावण्यापेक्षा तिच्या कृतीचे आणि विचारांचे परीक्षण झाले पाहिजे. हिंसेला कायद्याने, चुकीच्या विचारांना तर्काने आणि असहमतीला लोकशाहीच्या माध्यमातून उत्तर देणे हीच संविधानाची शिकवण आहे. कारण मजबूत राष्ट्राची ओळख केवळ त्याच्या शत्रूंवर विजय मिळवण्यात नसते, तर आपल्या नागरिकांना प्रश्न विचारण्याचे स्वातंत्र्य देण्यात असते. नक्षलवादाचा पराभव आवश्यक आहे; पण असहमतीचा आवाज दडपणे हा लोकशाहीचा विजय नसून तिची कमजोरी ठरेल.

१५ ऑगस्ट २०२६ रोजी स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने दिल्लीतील लाल किल्ल्यावरून देशाला संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नक्षलवादाच्या प्रश्नावर भाष्य केले. सशस्त्र नक्षलवादाचा प्रभाव कमी झाल्याचे सांगताना त्यांनी आता समाजातील "दिमागी नक्षल' म्हणजेच नक्षली विचारसरणीला वैचारिक पाठबळ देणाऱ्या प्रवृत्तींचा बंदोबस्त करण्याची गरज व्यक्त केली. या वक्तव्यावर विरोधी पक्षांनी एकत्रित प्रतिक्रिया व्यक्त करत सरकारच्या या भाषेवर आक्षेप घेतला आहे. विशेषतः यापूर्वी वापरल्या गेलेल्या "शहरी नक्षल' या शब्दप्रयोगाच्या पार्श्वभूमीवर "दिमागी नक्षल' ही नवी संज्ञा नेमकी कोणासाठी वापरली जात आहे, हा प्रश्न आता राष्ट्रीय चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे.

नक्षलवादाचा हिंसक चेहरा भारतासाठी नवीन नाही. बंदुकीच्या बळावर घटनात्मक लोकशाही उलथवून टाकण्याचा प्रयत्न करणाऱ्या सशस्त्र नक्षलवादाविरुद्ध राज्याने कठोर भूमिका घेतलीच पाहिजे. सुरक्षा दलांवरील हल्ले, नागरिकांची हत्या, खंडणी, हिंसाचार किंवा सशस्त्र बंडखोरी यांना कोणत्याही परिस्थितीत लोकशाही संघर्ष म्हणता येणार नाही. त्यामुळे हिंसक नक्षलवादाचा मुकाबला करणे ही सरकारची घटनात्मक जबाबदारी आहे.

मात्र, १५ ऑगस्टच्या भाषणानंतर निर्माण झालेला वाद नक्षलवादाचा विरोध करायचा की नाही, याबाबत नाही. खरा प्रश्न आहे"दिमागी नक्षल' म्हणजे नेमके कोण?

"शहरी नक्षल'या शब्दापासून सुरू झालेला प्रवास गेल्या काही वर्षांत "अर्बन नक्षल' किंवा "शहरी नक्षल' हा शब्द भारतीय सार्वजनिक आणि राजकीय चर्चेत मोठ्या प्रमाणावर वापरला गेला. सरकारच्या धोरणांवर टीका करणारे काही सामाजिक कार्यकर्ते, बुद्धिजीवी, लेखक, विद्यार्थी, पत्रकार किंवा डाव्या विचारसरणीशी संबंधित व्यक्ती यांच्याविषयी हा शब्द वापरला गेला.

या शब्दप्रयोगावर तेव्हापासूनच प्रश्न उपस्थित झाले. "शहरी नक्षल'ही कायदेशीर संज्ञा आहे का? तिची अधिकृत व्याख्या काय? कोणत्या निकषांवर एखाद्या व्यक्तीला "शहरी नक्षल' ठरविले जाईल? आणि सरकारच्या धोरणाला विरोध करणे व नक्षली हिंसाचाराला समर्थन देणे यामध्ये फरक कसा केला जाईल?

या प्रश्नांची स्पष्ट उत्तरे नसतील तर एखादी राजकीय संज्ञा हळूहळू आरोपाचे साधन बनण्याची शक्यता असते. आता "शहरी नक्षल'नंतर "दिमागी नक्षल'हा शब्दप्रयोग पुढे आला आहे. त्यामुळे विरोधकांनी दोन्ही संज्ञांमध्ये साम्य असल्याचे सांगत सरकारवर टीका केली आहे. त्यांचा आक्षेप असा आहे की सशस्त्र नक्षलवादाचा प्रश्न वेगळा असताना सरकारविरोधी वैचारिक असहमतीला नक्षलवादाशी जोडण्याचा प्रयत्न होऊ नये.

विचार आणि हिंसा यांच्यातील सीमारेषा स्पष्ट असली पाहिजे या चर्चेत सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे विचार आणि हिंसा यांच्यातील फरक.

एखादी व्यक्ती सरकारच्या आर्थिक धोरणावर टीका करते म्हणून ती नक्षलवादी होत नाही. एखादा विद्यार्थी बेरोजगारीविरोधात आंदोलन करतो म्हणून तो नक्षलवादी होत नाही. एखादा प्राध्यापक सरकारच्या शिक्षणधोरणावर प्रश्न उपस्थित करतो म्हणून त्याच्यावर नक्षली विचारसरणीचा शिक्का मारता येत नाही. एखादा पत्रकार सत्तेच्या निर्णयांवर कठोर टीका करतो म्हणून तो राष्ट्रविरोधी ठरत नाही.

परंतु एखादी व्यक्ती सशस्त्र हिंसाचाराला समर्थन देते, दहशतवादी कारवायांना मदत करते किंवा हिंसक बंडाला प्रत्यक्ष प्रोत्साहन देते, तर तो गंभीर कायदेशीर विषय आहे.

ही सीमारेषा जितकी स्पष्ट राहील, तितकी लोकशाही मजबूत राहील. "दिमागी नक्षल'ची व्याख्या अस्पष्ट राहू नये "दिमागी नक्षल'हा शब्द जर नक्षली हिंसाचाराला वैचारिक किंवा संघटनात्मक पाठबळ देणाऱ्या विशिष्ट घटकांसाठी वापरला जात असेल, तर सरकारने त्याची स्पष्ट व्याख्या करणे आवश्यक आहे.

अन्यथा या शब्दाचा अर्थ प्रत्येकजण आपल्या राजकीय सोयीनुसार लावू शकतो. सरकारवर टीका करणारा विरोधी पक्षनेता "दिमागी नक्षल' आहे का?

शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी आंदोलन करणारा कार्यकर्ता "दिमागी नक्षल'आहे का? सरकारच्या आर्थिक धोरणावर प्रश्न विचारणारा अर्थतज्ज्ञ "दिमागी नक्षल' आहे का?

विद्यापीठात सत्तेच्या धोरणावर चर्चा करणारा विद्यार्थी "दिमागी नक्षल' आहे का?

या प्रश्नांची उत्तरे "नाही' अशी स्पष्टपणे सरकारकडूनच दिली गेली पाहिजेत. कारण लोकशाहीत असहमतीला जागा नसली तर निवडणुका केवळ सत्तांतराचे माध्यम उरतात; लोकशाहीचा आत्मा मात्र कमकुवत होतो.

#### विरोधी पक्षांची प्रतिक्रिया का महत्त्वाची?

या वक्तव्यावर विरोधी पक्षांनी एकत्रित प्रतिक्रिया देणे ही केवळ राजकीय संधीसाधूपणाची बाब म्हणून दुर्लक्षित करता येणार नाही. सत्ताधारी पक्षाच्या भाषेवर प्रश्न उपस्थित करणे हा विरोधकांचा घटनात्मक आणि राजकीय अधिकार आहे.

मात्र विरोधकांनीही या संपूर्ण चर्चेत एक महत्त्वाची स्पष्टता दाखविणे आवश्यक आहे. नक्षलवादाच्या हिंसक स्वरूपाला कोणत्याही प्रकारचे समर्थन नाही, हे त्यांनी ठामपणे सांगितले पाहिजे. त्याचबरोबर "दिमागी नक्षल' या संज्ञेचा गैरवापर होऊ नये, यासाठी कायदेशीर निकष आणि पुराव्यावर आधारित कारवाईची मागणी केली पाहिजे.

म्हणजेच विरोधकांची भूमिका केवळ "पंतप्रधानांनी चुकीचे बोलले' एवढ्यावर थांबता कामा नये. त्याऐवजी त्यांनी विचारले पाहिजे‌ हिंसक नक्षलवाद आणि घटनात्मक असहमती यांच्यात सरकार कोणती स्पष्ट रेषा आखणार आहे?

#### लाल किल्ल्यावरून वापरलेल्या शब्दांचे वजन मोठे असते

लाल किल्ला हा केवळ पंतप्रधानांच्या भाषणाचा मंच नाही. तो भारताच्या स्वातंत्र्याचा आणि राष्ट्रीय अस्मितेचा प्रतीकात्मक मंच आहे.

१५ ऑगस्टला देशाला संबोधित करताना पंतप्रधानांनी वापरलेला प्रत्येक शब्द देशाच्या राजकीय वातावरणावर परिणाम करतो. त्यामुळे "दिमागी नक्षल'सारख्या संज्ञेचा वापर करताना त्याची व्याप्ती, उद्देश आणि मर्यादा स्पष्ट असणे अधिक आवश्यक आहे.

स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास पाहिला तर ब्रिटिश सत्तेला प्रश्न विचारणारे, अन्यायाविरुद्ध आंदोलन करणारे, वेगवेगळ्या विचारांचे लोक या संघर्षाचा भाग होते. त्यामुळे स्वतंत्र भारतात सरकारवर प्रश्न विचारणे ही राष्ट्रविरोधी कृती नसून स्वातंत्र्याचेच एक फलित आहे.

#### लेबल लावण्याऐवजी विचारांना उत्तर द्यावे

भारतीय राजकारणात गेल्या काही वर्षांत "अर्बन नक्षल', "टुकडे-टुकडे गँग', "देशद्रोही', "अराजकतावादी' अशा विविध विशेषणांमधून राजकीय विरोधकांचे वर्गीकरण करण्याची प्रवृत्ती वाढल्याची टीका होत आहे.

या पद्धतीचा सर्वांत मोठा धोका असा की व्यक्तीच्या विचारांना उत्तर देण्याऐवजी तिच्या राष्ट्रभक्तीवर प्रश्न उपस्थित केला जातो.

एखाद्या अर्थतज्ज्ञाचे आर्थिक विश्लेषण चुकीचे असेल तर आकडेवारीने त्याला उत्तर द्यावे. एखाद्या लेखकाचे राजकीय मत चुकीचे वाटत असेल तर त्याचे वैचारिक खंडन करावे. एखाद्या आंदोलनाच्या मागण्या चुकीच्या असतील तर त्याबाबत जनतेसमोर तथ्ये मांडावीत.

#### लेबल लावणे हा युक्तिवादाचा पर्याय होऊ शकत नाही

सत्तेला प्रश्न विचारणारा नागरिक शत्रू नसतो

लोकशाहीत सत्तेची खरी ताकद विरोधक नसल्यात नसते; तर विरोधक असतानाही शासन करण्याच्या क्षमतेत असते.

सरकारच्या प्रत्येक निर्णयाला समर्थन मिळाले तर ती लोकशाहीची ताकद नसून राजकीय एकसुरीपणा ठरेल. संसदेत विरोधी आवाज, माध्यमांतील टीका, विद्यापीठातील चर्चा, रस्त्यावरची शांततापूर्ण आंदोलने आणि न्यायालयीन परीक्षणही लोकशाहीची आवश्यक नियंत्रणव्यवस्था आहे. त्यामुळे सरकारविरोधी असणे आणि राष्ट्रविरोधी असणे यात मूलभूत फरक आहे.

हा फरक जाणीवपूर्वक पुसला गेला तर उद्या कोणतेही सरकार आपल्या विरोधकांना कोणत्याही धोकादायक विशेषणाने संबोधू शकते. हा धोका एका पक्षापुरता मर्यादित नाही; तो संपूर्ण लोकशाही व्यवस्थेसाठी आहे.

#### नक्षलवादाचा पराभव हवा; पण असहमतीचा नाही

भारताने सशस्त्र नक्षलवादाचा पराभव करण्यासाठी कठोर सुरक्षा कारवाईबरोबरच विकास, शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि आदिवासी भागातील प्रशासनाची विश्वासार्हता वाढविण्यावरही भर दिला पाहिजे.

पण नक्षलवादाचा पराभव करताना विचारांच्या विविधतेचा पराभव करण्याची गरज नाही. हिंसक नक्षलवादाचा मुकाबला कायद्याने करा; नक्षली विचारसरणीचा मुकाबला तर्काने करा; पण सरकारवर टीका करणाऱ्या प्रत्येक आवाजाला नक्षलवादाचे लेबल लावू नका.

ही भूमिका सरकारविरोधी नाही; उलट ती संविधानाच्या बाजूची भूमिका आहे.

"शहरी नक्षल' ते "दिमागी नक्षल'शब्द बदलण्यापेक्षा अर्थ स्पष्ट करा "शहरी नक्षल' हा शब्दप्रयोग असो किंवा आता पुढे आलेला "दिमागी नक्षल' हा शब्दप्रयोग असो, देशासमोर आज महत्त्वाचा प्रश्न शब्दांचा नाही, तर त्यांच्या वापराच्या मर्यादांचा आहे.

जर या संज्ञांचा उद्देश हिंसक नक्षलवादाला वैचारिक, आर्थिक किंवा संघटनात्मक मदत करणाऱ्या घटकांना ओळखणे असेल, तर त्यासाठी कायदेशीर निकष असावेत. पुरावे असावेत. न्यायालयीन प्रक्रिया असावी. कारवाई संविधानाच्या चौकटीत असावी.

पण जर या संज्ञांचा वापर केवळ सरकारविरोधी विचारांना बदनाम करण्यासाठी केला गेला, तर तो लोकशाहीसाठी चिंतेचा विषय ठरेल.

भारताला नक्षलवादमुक्त करणे जितके आवश्यक आहे, तितकेच भारताला असहमतीमुक्त होण्यापासून वाचवणेही आवश्यक आहे.

१५ ऑगस्टच्या लाल किल्ल्यावरून "दिमागी नक्षल'चा उल्लेख झाला; आता देशासमोरची खरी गरज या शब्दाभोवती राजकीय आरोप-प्रत्यारोप वाढवण्याची नसून त्याचा अर्थ स्पष्ट करण्याची आहे.

कारण लोकशाहीमध्ये प्रश्न विचारणारा नागरिक हा राष्ट्राचा शत्रू नसतो. विरोधी मत म्हणजे देशद्रोह नसतो. सरकारवर टीका म्हणजे नक्षलवाद नसतो.

नक्षलवादाविरुद्ध कठोर लढा आवश्यकच; पण असहमतीच्या आवाजाविरुद्ध लढा ही लोकशाहीची गरज नाही.

शेवटी एवढेच‌‌शहरी नक्षलफ असो वा ‌दिमागी नक्षलफ; लोकशाहीत व्यक्तीला लेबल लावण्यापेक्षा त्याच्या कृतीचे परीक्षण झाले पाहिजे आणि विचारांना विचारांनीच उत्तर दिले पाहिजे. हीच संविधानाची खरी शिकवण आणि स्वातंत्र्यदिनाच्या लाल किल्ल्याला साजेशी लोकशाहीची भाषा आहे.

नक्षलवादाच्या हिंसक विचारसरणीचा मुकाबला कठोरपणे झालाच पाहिजे; मात्र सरकारवर प्रश्न विचारणाऱ्या प्रत्येक नागरिकाला "शहरी नक्षल' किंवा "दिमागी नक्षल' ठरवणे ही लोकशाहीची दिशा असू शकत नाही. हिंसेला कायद्याने उत्तर द्यावे, चुकीच्या विचारांना तर्काने प्रत्युत्तर द्यावे आणि असहमतीला संविधानाने दिलेला अधिकार मानावे. कारण नक्षलवादाचा पराभव करणे जितके आवश्यक आहे, तितकेच लोकशाहीतील प्रश्न विचारण्याचा आवाज जिवंत ठेवणेही आवश्यक आहे.

**प्रा. डॉ. किशोर कल्लापा म्हेत्री**
माजी विभाग प्रमुख, राज्यशास्त्र विभाग, गोगटे वाळके महाविद्यालय बांदा, सिंधुदुर्ग

## साकोली येथे ओबीसी जनगणनेसाठी तहसीलदारांमार्फत निवेदन सादर

**साकोली:** ओबीसी प्रवर्गाची जातनिहाय जनगणना झालीच पाहिजे, या प्रमुख मागणीसाठी साकोली येथे विविध ओबीसी संघटना आणि लोकप्रतिनिधींच्या वतीने साकोलीचे तहसीलदार यांच्यामार्फत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय जनगणना आयुक्त मृत्युंजय कुमार नारायण, केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्री डॉ. वीरेंद्र कुमार खाटिक आणि राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाच्या अध्यक्षा साध्वी निरंजन ज्योती यांना निवेदन पाठवण्यात आले.

ओबीसी समाजाला त्यांचे हक्क आणि लोकसंख्येच्या प्रमाणात न्याय मिळण्यासाठी जातनिहाय जनगणना अत्यंत आवश्यक असल्याचे या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या मागणीसाठी साकोली तालुक्यातील ओबीसी बांधव मोठ्या संख्येने एकत्र आले होते.या निवेदन सादरीकरण प्रसंगी साकोली तालुक्याचे मुख्य समन्वयक केशव अतकरी, साकोली नगरपरिषदेच्या माजी नगराध्यक्षा सौ. देवश्री कापगते, ॲड. मनिष कापगते, डॉ. अशोक कापगते,एकनाथ सारवे, राध्यशाम खोब्रागडे, विनोद तीडके, चंद्रशेखर कापगते, भाऊराव फुलबांधे, बुधराम भुरे,रूनाल मोरांडे, सुर्यभान चेटुले, नगरसेवक धीरज सुरसाऊत, खेमु मोटघरे, सुखराम गभने, मनोहर तलमले, किशोर तरजुले, जयकृष्ण खराबे, रविकुमार मस्के, अर्णव हटवार, दिवाकर कापगते, सुरेश ठाकरे, शिवप्रसाद लांजेवार, चंद्रकांत सारंगपूरे, नंदलाल लंजे, आणि लेकचंद राउत,सौ. सीमा कापगते, अनिता कापगते, सौ. भारती हातगाडे, ज्योती चांदेवार, सौ. सिंधु खोब्रागडे, कल्पना अतकरी, सुभद्रा सारवे, शशिकला चेटुले, भारती लंजे, आणि नगरसेविका प्रितीताई डोंगरावर प्रामुख्याने उपस्थित होते.ओबीसी समाजाच्या प्रलंबित मागण्यांकडे केंद्र सरकारने तातडीने लक्ष देऊन आगामी जनगणनेत ओबीसींचा स्वतंत्र रकाना समाविष्ट करावा, अशी आग्रही मागणी या वेळी उपस्थित सर्व कार्यकर्त्यांनी व नेत्यांनी केली आहे.

## राहुल गांधींवरील कारवाईच्या निषेधार्थ गोंदिया जिल्हा काँग्रेसचे उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन

**गोंदिया:**उत्तराखंडमधील हल्द्वानी प्रकरणात लोकसभेतील विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी यांच्याविरोधात हल्द्वानी शहर कोतवाली पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आलेल्या मएफआयआरफच्या निषेधार्थ गोंदिया जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने उपविभागीय अधिकारी कार्यालयावर आज मोर्चा काढून निदर्शने करण्यात आली. तसेच राष्ट्रपतींच्या नावे असलेले निवेदन उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत पाठविण्यात आले.

हल्द्वानी येथील रामलीला मैदान परिसरात काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या सभास्थळाचे भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यकर्त्यांकडून करण्यात आलेले मशुद्धीकरणफ हे अत्यंत निंदनीय व घृणास्पद असल्याचा आरोप काँग्रेसतर्फे करण्यात आला आहे. या घटनेवर पत्रकार परिषदेत ताकीद देत योग्य आणि कठोर कारवाईची मागणी करणाऱ्या राहुल गांधींवरच सूडबुद्धीने गुन्हे दाखल करण्यात आल्याचे निवेदनात नमूद केले आहे. रामलीला मैदानाचे तथाकथित शुद्धीकरण करून सामाजिक तेढ निर्माण करणाऱ्या भाजप व आरएसएसच्या कार्यकर्त्यांवर कठोर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.यावेळी गोंदिया पी. जी. कटरे, रमेश अंबुले, जीवन क्षीरसागर, जहीर अहमद, हेमेंद्र राहंगडाले, मनिष मेश्राम, आनंद लांजेवार, डी. एन. येळे,आकाश उके, रणजीत गणवीर, राजकुमार पटले,डेमेंद्र रहागंडाले,राजू चामट,हितेश जांभुळकर, मनोज पटनायक, क्रिपाल लिल्हारे आणि भूपेंद्र हरिनखेडे यांच्यासह पक्षाचे अनेक प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



## जात वैधता प्रमाणपत्रासाठी २ सप्टेंबरला उपस्थित राहावे

**गोंदिया :** सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात सीईटी, जेईई, नीट यासारख्या प्रवेश पात्रता प्रक्रियेमधून व्यावसायिक अभ्यासक्रमात आरक्षीत प्रवर्गातून प्रवेश घेणाऱ्या ज्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी आपले जाती दावा पडताळणीसाठी प्रस्ताव जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, गोंदिया येथे सादर केलेले आहेत परंतु अर्जदारांना त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाले नाहीत त्यांन दि.२ सप्टेंबर २०२६ रोजी उपस्थित रहावे.

# राहुल गांधींचा पुण्यात मुलींशी संवाद आणि मनुसमर्थकांचा जळफळाट

महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी १८४८ ला पुण्यात मुलींची पहिली एतद्देशिय शाळा सुरू करुन, मुलींना शिक्षण आणि सन्मान नाकारणाऱ्या मनुस्मृतीला हरताळ फासला. मनुस्मृतीला धिक्कारले. हेच पुणे सनातन्यांचे, मनुस्मृतीच्या समर्थकांचे देखील केंद्र राहिलेले आहे. आज देशभरात मनुचे समर्थक धुडगुस घालत असताना, लोकांना भयभीत करत असताना राहुल गांधी यांनी त्याच पुण्यात मुलींना निर्भय आणि निर्णयक्षम बणविण्याच्या हेतूने 'छात्रोंकी गुंज', हा कार्यक्रम आयोजित करुन मनुस्मृतीच्या विषमतावादी व्यवहाराला जाहीर आक्षेप घेतला. राहुल गांधी यांच्या उपस्थितीत मुली आपल्यावर होत असलेल्या अन्यायाबाबत जाहीरपणे व्यक्त झाल्या, रद्द होणाऱ्या परीक्षांचे त्यांच्या जीवणावर होणारे परिणाम, वय वाढले की पालकांकडून लग्नाची घाई केली जाते आणि संधी निघून जातात. त्यामुळे पेपर फोडीचे परीणाम मुलांपेक्षा मुलींवर अधिक होतात, यावरही मुलींनी चर्चा केली आणि होणाऱ्या अन्यायाविरुद्ध लढण्याची तयारीही आत्मविश्वासाने दाखवली.

'छात्रोंकी गुंज' या कार्यक्रमात राहुल गांधींनी केवळ मनकी बात नाही केली. मुलींना मंचावर बोलावून त्यांच्या समस्या स्वतः मांडायची संधी दिली. यातून लोकशाही आणि जन की बात कशाला म्हणते, हे प्रस्तुत केले. मुलींना मुक्तपणे बोलू दिले,त्यांचा आत्मविश्वास वाढवला. मुली बिनधास्त बोलल्या. घरापासून तर सार्वजनिक ठिकाणी होणाऱ्या त्रासाबद्दल, मिळत असलेल्या दुय्यम वागणूकीबाबत, संधी हिरावून घेत असल्याबाबत बोलल्या. मुलगा घरी उशिरा आला तरी चालतो, परंतु कितीही कर्तृत्ववान असली तरी मुलगी उशिरा घरी आलेली चालत नाही, असेही अनुभव मुलींनी मांडले. सरकार, प्रतिनिधी आणि प्रशासन यांच्याकडून देखील महिलांची गळचेपी केली जाते. दुय्यमतेची वागणूक दिली जाते. छळ केला जातो. अवहेलना, अत्याचार केले जातात, यावरही मुली निडरपणे बोलल्या. मस्तवाल सत्तेला निडरपणे आपल्या गीतांमधून प्रश्न करणारी जाँबाज सटायरीस्ट, गायक नेहासिंग राठोड हिनेही भोजपुरी गीते सादर करतानाच आपल्याला कसे गलीच्छपणे ट्रोल केले जाते,याची आपबिती सांगितली. काही मुलींनी देशाला मेडल मिळवून देणाऱ्या, देशाचं नाव मोठं करणाऱ्या खेळाडू मुलींना न्याय मिळत नसेल तर आमच्या सारख्या खेड्यातून, गरीबीतून आलेल्या मुलींना कोण न्याय देईल, असे प्रश्न उपस्थित केले. आदिवासी मुलींनी आपल्यासोबत कसा भेदभाव केला जातो, याची आपबिती सांगितली. आदिवासी वसतिगृहाचे प्रश्न मांडले. या सर्व मुली ५६ इंची मस्तवाल सत्तेला निर्धाराने उघडे, नागडे करत होत्या. आपले आईवडील देखील मुलींसोबत असं का वागतात, असेही प्रश्न राहुल गांधींनी मुलींना विचारले. मुलींच्या काळजीपोटी आईवडील असे वागतात हे खरे असले तरी तेवढेच खरे नाही. काळजी वाटावी असे वातावरण का आहे? आणि आईवडील मुली-मुलांमध्ये भेद का करतात? याचा उलगडा करत राहुल गांधी विश्लेषण करतात.




पीपीटी शोच्या माध्यमातून एक एक बाबी स्पष्ट करतात. लोकांचा माईड सेट करणाऱ्या व्यवस्थेचा उलगडा करतात. सुरुवातीला ते सत्तर करोड महिला, ही भारताची ताकद असल्याचे, महत्त्वाचे स्टेटमेंट करतात. ७० करोड स्त्रिया असेट असल्याचे सांगतात. आणि ७० करोड स्त्रीयांची अवहेलना जर आपल्या देशात होत असेल, छळ होत असेल, बलात्कार होत असेल, टिंगलटवाळी होत असेल, अधिकार मिळत नसेल, ट्रोलींग होत असेल तर आपला देश प्रगती करू शकत नाही, हे सांगितले. मॉलेस्टेशन, बलात्कार व इतर अत्याचाराची आकडेवारी पुढे आणून लज्जेपाई अनेक गुन्ह्यांची नोंद होत नसल्याने, या आकडेरीपेक्षा मोठ्या प्रमाणात महिला अत्याचारांच्या घटना घडत असल्याने, त्याचे गांभीर्य लक्षात घेण्याची गरज असल्याचे सांगितले. ५० करोडकी गर्लफ्रेंड सारखे ५५, ५६,५७ इंचीवाल्यांचे व्हिडिओ, महिलाविरोधी स्टेटमेंट राहुल गांधींनी लोकांसमोर दाखवले.

आणि त्यानंतर हा माईड सेट घडवणारी व्यवस्था ही मनुस्मृतीची व्यवस्था असल्याचे उलगडून दाखवले. मनुस्मृतीच्या नवव्या अध्यायातील दुसऱ्या श्लोकामध्ये, स्त्रीयांनी विवाहाच्या पूर्वी पित्याने स्त्रीयांचे रक्षण करावे. त्यानंतर पतीने त्यांचे रक्षण करावे व पतीच्या मागे पुत्रांनी रक्षण करावे. कोणतीही स्त्री स्वातंत्र्यास योग्य नाही. असं सांगणारा श्लोक समोर ठेवला. त्याची चिकित्सा मांडली. स्त्रीची ओळख मुलगी, पत्नी, आई आहे. ही ओळख गैर नाही. परंतु स्त्रीची एवढीच ओळख पुरेशी नाही. तीचं स्वतंत्र अस्तित्व ही सर्वात मोठी आणि खरी ओळख आहे. मनुस्मृती हे नाकारते. हा मनुस्मृतीचा माईड सेट टिकवण्याचं काम संघ करतो. वेळोवेळी मनुस्मृतीचं गुणगान करतो. या माईड सेटचा पिंजरा तोडण्याचे राहुल गांधी यांनी मुलींना आव्हान केले. जंतरमंतर आंदोलनात मुलांनी शिव्या दिल्या तर काही अडचण नाही. परंतु मुलींनी शिव्या दिल्या तर तो कल्चरल शॉक असतो, असं समजणारे देखील विषमतावादी, महिलाविरोधी असल्याचे सांगितले. मुलींना बोलतं करत, राहुल गांधींनी स्त्रीयांच्या संघर्षाची दिशा स्पष्ट केली.

'छात्रोंकी गुंज' या कार्यक्रमाच्या माध्यमातून राहुल गांधींनी मुलींचा आत्मविश्वास वाढविण्याचे कार्य केले. मुलींना स्वतःचे निर्णय घेण्याचा अधिकार आहे. तीचे निर्णय दुसरा कोणी घेऊ शकत नाही. तीच्यावर निर्णय थोपवण्याचा अधिकार कोणालाही नाही. निर्णय घेण्याचं जितकं स्वातंत्र्य पुरुषांना आहे. तितकच स्त्रीयांना देखील आहे. म्हणून स्त्रीयांवर हक्क गाजवण्याची मनुस्मृतीकृत मानसिकता धिक्कारावी लागेल , अशी चर्चा राहुल गांधींनी केली. खरे तर ही राहुल गांधींची मांडणी अस्सल सामाजिक स्वरुपाची आहे. राजकारणावर बोलणार नाही म्हणून सुरुवातीलाच स्पष्ट केलं आणि शेवटपर्यंत राजकारणावर बोलणं टाळलं. एक मुलगी राजकारणावर बोलायला लागल्यावर तीला सुद्धा अडवलं. खरे तर सर्व पक्षातील, जाती, धर्मातील मुलींच्या हिताच्या दृष्टीने हा महत्वाची चर्चा करणारा कार्यक्रम ठरला. परंतु काही लोकांना मिरच्या झोंबल्याच. त्यांची जळफळाट झाली. म्हणून त्यांच्या जळफळाटाची कारणे काय? असू शकतात याचीही चर्चा झाली पाहिजे.

राहुल गांधी काँग्रेसचे नेते आहे. विरोधी पक्षनेते आहेत. म्हणून ते काहीही बोलले, कोणताही कार्यक्रम घेतला तरी त्यांच्या विरोधात बोलायचे आणि टिंगलटवाळी करायची, हे अतिशय निच प्रतीचे राजकारण आहे. सर्वांच्याच मुलींचा आत्मविश्वास वाढवणाऱ्या कार्यक्रमाला देखील, तो केवळ राहुल गांधींनी घेतला म्हणून संघ भाजप निरपेक्ष भूमिकेतून पाहु शकले नाही. आणि या मुळेच एरवी इतका राजकीय तोटा झाला नसता, त्यापेक्षा जास्त राजकीय तोटा भाजपला होणार आहे. राहुल गांधींच्या विरोधात बोलून आपले खरे संस्कारही दाखवले आणि सौजन्यहिनताही. स्त्रियांच्या बाबतीत न्यायाची, समतेची भूमिका असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने निरपेक्षपणे कौतुक करायला पाहिजे इतका तो कार्यक्रम कंटेन्ट आणि प्रेझेंटेशन दोन्ही अंगांनी दर्जेदार ठरला. मुलींचा उत्स्फूर्त आणि मनमोकळा सहभाग हे त्या कार्यक्रमाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरले. भाजप, संघाचा मात्र जळफळाट झाल्याचे, त्यांच्या प्रतिक्रियांवरुन स्पष्ट झाले.

ते स्वाभाविकही म्हणता येईल. भाजपमध्ये दोन प्रकारचे नेते, कार्यकर्ते आहेत. एका वर्गाने मनुस्मृती वाचलेली आहे. त्यांना, मनुस्मृती सर्व स्त्रिया आणि शुद्रातिशुद्र ओबीसी दलित आदिवासी यांना निच मानणारी, अपमान करणारी, अधिकारहीन करणारी आहे, हे माहीत आहे. परंतु ब्राह्मण वर्चस्व अबाधित राहिले पाहिजे, सर्व स्त्रीयांनी आणि बहुजनांनी बरोबरीची अपेक्षा ठेवू नये, सेवा हाच त्यांचा धर्म आहे, असे मानणारा हा वर्ग असल्यामुळे तो मनुस्मृतीचे आपमतलबीपणाने समर्थन करतो. भाजप आरएसएस मधला दुसरा वर्ग ज्यांनी मनुस्मृती वाचलीच नाही. तो कशासाठी समर्थन करतो, त्यालाच माहीत नाही. हा अंधभक्त वर्ग आहे. ओबीसी, दलित, आदिवासी युवकांनी आणि सर्व जातीतील स्त्रीयांनी मनुस्मृती वाचली तर ते कधीच मनुस्मृतीचे समर्थन करु शकत नाही. अशा स्थितीत आपला अंधभक्त वर्ग आपल्या हातातून सुटून जाईल आणि केवळ ब्राह्मणांचेच हीत जोपासणारी मनुवादी व्यवस्था कोलमडेल म्हणून मनुसमर्थक भाजप संघी थयथयाट करताना दिसत आहे.

महिला, युवक आणि ओबीसींची जागृती संघ भाजपची सत्ता उलथवेल ही भिती देशभरातील आपल्या हक्कासाठी जागृत झालेल्या जेनझीच्या बाजुने राहुल गांधी उभा राहतो, ७० कोटी महिलांच्या सन्मानासाठी मुलींना ताकदीने उभे राहण्यासाठी राहुल गांधी त्यांच्या सोबत ठामपणे उभा राहतो. मनुस्मृतीच्या विषवल्लीची चिरफाड करतो, ५२ टक्के ओबीसींना लोकसंख्या प्रमाणात प्रतिनिधित्व यासाठी संघर्ष करतो, ओबीसी, आदिवासी, दलित, अल्पसंख्याक सर्वांना समान हक्क मिळाला पाहिजे याची मांडणी करतो. आता भाजप संघाने कितीही सोंगं केली तरी महिला आणि युवकांसोबत त्यांनी केलेले उन्मत्त व्यवहार, त्यातून उफाळलेला असंतोष मोठा आहे. आणि आताही त्यांची उन्मत्तपणाची भाषा बदलली नाही. यातून ते कसेही, असंबंध बोलताना दिसत आहे. महिला आणि युवा यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहुन राहुल गांधींनी संघ भाजपला बॅक्फ्रफूटवर नेले एवढे निश्चित.

मनुस्मृती मध्ये मुलींचे स्थान काय? याची चर्चा मुली करणार. महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांचा अपमान करणाऱ्या मनुस्मृतीचा धिक्कार केला, याचा इतिहास पुढे ठेवून राहुल गांधींनी त्यांचा समतेचा वसा पुढे नेण्याचा निर्धार केला. महात्मा फुले मनुमत जाळा म्हणतात आणि बाबासाहेब छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मृतीस्थळ रायगडाच्या पायथ्याशी महाड येथे मनुस्मृती जाळतात. केवळ मनुस्मृतीचे दहण करून थांबत नाही. महाड येथेच चवदार तळ्याच्या पाण्याला स्पर्श करून मनुस्मृतीचे अमानवी नियम नाकारतात. भारतीय सविधानात स्त्रीयांना समान अधिकार देण्यासाठी आग्रह धरतात. पुढे महिलांना समान अधिकार देणारे हिंदू कोड बिल संसदेत मांडतात. मनुस्मृती महिलांना दुय्यम लेखते, अपमानित करते आणि लोकशाही,भारतीय संविधान महिलांना सन्मान, समान अधिकार देते. म्हणून मुलींनी आपला सन्मान होणाऱ्या बाजुने ठामपणे उभे राहिले पाहिजे, हाच यानिमित्ताने ऐरणीचा मुद्दा आहे.

**बाबा बीडकर**

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# जातनिहाय जनगणनेतून सामाजिक न्यायासाठी वस्तुनिष्ठ आकडेवारी

**नागपूर :-** देशातील ओबीसींसह सर्व जातींची जातनिहाय जनगणना झाल्यास त्यातून नुकसान होण्याऐवजी सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक धोरणांसाठी आवश्यक वस्तुनिष्ठ आकडेवारी उपलब्ध होईल. विविध समाजघटकांची नेमकी लोकसंख्या आणि त्यांची सामाजिक-आर्थिक स्थिती समोर आल्यास सरकारी योजनांचा लाभ अधिक लक्ष्यित पद्धतीने देता येईल. जातनिहाय जनगणनेमुळे जातीयवाद वाढेल हा आक्षेप निराधार असल्याचे मत सामाजिक न्याय विषयावरील अभ्यासकांनी मांडले.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेन्शन सेंटर येथे रविवारी दिल्ली विद्यापीठाचे प्राध्यापक डॉ. लक्ष्मण यादव यांच्या पुस्तकाचे प्रकाशन आणि जातीय जनगणनेवर चर्चा पार पडली. यावेळी विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष आणि ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. सुखदेव थोरात, भारतीय मुस्लीम परिषदेचे अध्यक्ष जावेद पाशा, राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या उपाध्यक्ष रेखा बाराहाते आदी उपस्थित होते.

देशातील ९० टक्के ओबीसी आणि मागासवर्गीय लोकसंख्येला न्याय द्यायचा असेल, तर सर्व जातींची जनगणना होणे आवश्यक आहे. मंडल आयोगाने देशातील ३ हजार ७४३ जातींना ओबीसी म्हणून एका सूत्रात बांधले. त्यांची लोकसंख्या ५२ टक्के असल्याचे सांगितले जाते. पण त्यांना २७ टक्के आरक्षणाचा लाभ मिळतो. सर्व जातींची मोजणी झाल्यास लोकसंख्येच्या प्रमाणात धोरणे आखण्यास मदत होईल, असे डॉ. यादव यांनी सांगितले. देशाला शाळांची गरज आहे, मंदिरांची नाही, असे ते म्हणाले. पाशा पटेल यांनी मुस्लीम समाजाच्या आरक्षणाच्या प्रश्नावर भूमिका मांडली, तर बाराहाते यांनी ओबीसींनी कर्मकांडातून बाहेर पडून आपल्या हक्कांविषयी जागरूक होण्याचे आवाहन केले. यावेळी सकल ओबीसी महामोर्चाचे उमेश कोरीम यांनीही ओबीसींच्या जातीनिहाय जनगणनेचे महत्त्व सांगितले. अमन कांबळे यांनी सूत्रसंचालन केले.

**आरक्षणापुरतीच मर्यादा नको : डॉ. थोरात**

जातनिहाय जनगणना म्हणजे केवळ आरक्षणाचे प्रमाण निश्चित करण्यासाठीची प्रक्रिया नव्हे, विविध जातसमूहांची आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक स्थिती समजून घेण्यासाठी ही माहिती महत्त्वाची ठरू शकते. सध्या ओबीसींच्या लोकसंख्येबाबत सातत्याने प्रश्न उपस्थित केले जातात. त्यामुळे कोणता घटक अधिक वंचित आहे आणि मागासलेपणाचे स्वरूप काय आहे, याचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन जातिनिहाय आकडेवारीच्या आधारे करता येईल, असे प्रा. सुखदेव थोरात यांनी स्पष्ट केले.

# गोंदिया नगर परिषदेत 'निविदेविना लाखो रुपयांचे सीसीटीव्ही कॅमेरे'

**गोंदिया:-**नगर परिषदेचा मनमानी कारभार आणि ममी बोलेन तीच पूर्व दिशाफ अशी वृत्ती पुन्हा एकदा चव्हाट्यावर आली आहे. शासकीय नियमांची पायमल्ली करत आणि कोणतीही निविदा (ऊही) न काढता थेट लाखो रुपयांचे सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आल्याचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे. जनतेच्या कष्टाच्या कराचा पैसा नियमबाह्य मार्गाने उधळला जात असून, या संपूर्ण प्रकरणावर मुख्य अधिकारी व नगराध्यक्ष ममोनी बाबाफ बनून शांत बसल्याने तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गोंदिया नगर परिषदेच्या प्रत्येक विभागात नुकतेच नवीन सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले. विशेष म्हणजे, या सरकारी कार्यालयात प्रथमच आवाज नोंदवणारे हायटेक कॅमेरे लावण्यात आले आहेत. वीज विभाग, बांधकाम विभाग किंवा प्रशासकीय




अधिकारी झलके मॅडम यांच्यासह एकाही जबाबदार अधिकाऱ्याला हे कॅमेरे कोणत्या कंत्राटदाराने आणि कोणाच्या आदेशावरून बसवले, याची काहीही माहिती नाही. १५ दिवसांत कॅमेरे

गायबः कॅमेरे बसवल्यानंतर अवघ्या १५ दिवसांतच बांधकाम विभागातील कॅमेरे अचानक काढून टाकण्यात आले. हे कॅमेरे कोणी बसवले आणि कोणी काढले, यावर अद्यापही अनिश्चिततेचे सावट आहे. अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी आणि नागरिक यांच्यातील संभाषणे गुपचूप ऐकण्यासाठी हे कॅमेरे बसवण्यात आल्याचे समजते,ज्यामुळे यामागे मोठा राजकीय कट असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

नियम डावलून जर कोट्यवधी रुपयांची कामे परस्पर कंत्राटदारांना दिली जात असतील, तर मग नगर परिषदेच्या जाहीर सभा आणि बैठकांचे नाटक कशासाठी? असा थेट सवाल नागरिकांमधून विचारला जात आहे. नगरसेवकांनी या मनमानी कारभाराबाबत मुख्य अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रारी केल्या आहेत. मात्र,

तक्रारींची दखल घेऊन बेकायदेशीर कामे थांबवण्याऐवजी नगराध्यक्ष आणि मुख्य अधिकारी डोळ्यांवर पट्टी बांधून बसले आहेत. या उघडउघड चाललेल्या भ्रष्टाचाराची दऽखल घेऊन गोंदियाच्या जिल्हाधिकाऱ्यांनी, तसेच सत्ताधारी व विरोधी पक्षांच्या खासदार आणि आमदारांनी या आंधळ्या कारभारावर तात्काळ चाप लावावा आणि दोषींवर कडक कारवाई करावी, अशी जोरदार मागणी आता जोर धरू लागली आहे.

# सालेकसा नगरपंचायतीच्या स्वच्छता मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद !




**सालेकसा :-** नगरपंचायत सालेकसाच्या वतीने शहर स्वच्छ, सुंदर व निरोगी ठेवण्याच्या ध्येयाने सुरू असलेला विशेष स्वच्छता मोहीमेचा यशस्वी प्रवासाचा २६ वा आठवडा रविवार, ३० ऑगस्ट रोजी अत्यंत उत्साही वातावरणात पार पडला.

सार्वजनिक स्वच्छता, आरोग्य व पाणीपुरवठा सभापती छन्नूताई शिवणकर यांच्या संकल्पनेतून व पुढाकारातून गेली सलग २६ आठवडे शहरातील वेगवेगळ्या भागांत ही स्वच्छता मोहीम अविरत सुरू आहे. या रविवारी सुभाष चौक परिसरातील मुख्य रस्ते, सार्वजनिक जागा आणि परिसर स्वच्छ करण्यात आला. केवळ कचरा उठवण्यावर भर न देता, नागरिकांना प्रत्यक्ष भेटून स्वच्छता, आरोग्य आणि योग्य कचरा व्यवस्थापनाचे महत्त्व पटवून देत जनजागृती करण्यात आली.

या मोहिमेत नगराध्यक्ष विजय फुंडे, सभापती छन्नूताई शिवणकर, नगरसेवक सतीश करवाडे, अतुल रेड्डीवॉर, रितेश लिल्लारे, नगरसेविका योगिता असाटी आणि भास्कर शिवणकर यांनी प्रत्यक्ष उतरून सहभाग नोंदवला. लोकप्रतिनिधींसोबतच नगरपंचायतीचे सर्व सफाई कर्मचारी आणि स्थानिक नागरिकांनीही उत्स्फूर्तपणे हातात झाडू घेऊन परिसर चकाचक केला.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामगीतेतील उपदेशाची आठवण करून देत, मजैसे आपण स्नान करावे, तैसे गावही स्वच्छ ठेवीत जावे, सर्वची लोकांनी झिजूनि घ्यावे, श्रेय गावाच्या उन्नतीचेफया संदेशाप्रमाणे सालेकसाला सुंदर बनवण्यासाठी प्रत्येकाने पुढे यावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. सलग अर्ध्या वर्षापासून (२६ आठवडे) सुरू असलेल्या या उपक्रमामुळे सालेकसा शहरात स्वच्छतेबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. मोहिमेच्या यशस्वीतेसाठी योगदान देणारे सर्व लोकप्रतिनिधी, कर्मचारी व नागरिकांचे नगरपंचायतीच्या वतीने आभार मानण्यात आले

# जि.प.ला मिळाले ४४५ शिक्षक

**गोंदिया :-** ग्रामीण भागातील शाळांमधील शिक्षकांच्या रिक्त पदांचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटण्याची चिन्हे आहे. पवित्र पोर्टलच्या माध्यमातून पहिल्या टप्प्यात जिल्हा परिषदेला ४४५ शिक्षक उपलब्ध झाले आहे. त्यांच्या कागदपत्रांची पडताळणी व समुपदेशन करून रिक्त शाळांमध्ये नियुक्ती करण्यात येणार आहे. हे शिक्षक पुढील १० ते १५ दिवसात संबंधित शाळांमध्ये रुजू होण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शिक्षकांची रिक्त पदे १८५ वर येणार आहे. उर्वरित पदे दुसऱ्या टप्प्यात भरण्यात येणार असल्याची माहिती प्राथमिक शिक्षणाधिकारी पवन खंडारे यांनी दिली.

जिल्हा परिषद अंतर्गत शिक्षक भरतीसाठी रिक्त पदांची माहिती

शासनाला सादर करण्यात आली होती. त्यानुसार प्राथमिक विभागातील बंगाली माध्यमाची ५, हिंदी माध्यमाची ९५, मराठी माध्यमाची ४७८ आणि माध्यमिक विभागातील मराठी माध्यमाची ५०, अशी एकूण ६२८ रिक्त पदे होती. यापैकी प्राथमिक विभागातील बंगाली माध्यमाची ३, हिंदी



माध्यमाची ६७, मराठी माध्यमाची ३३० आणि माध्यमिक विभागातील मराठी माध्यमाची ४५, अशी एकूण ४४५ पदे पवित्र

पोर्टलच्या माध्यमातून भरण्यात आली. येत्या दोन दिवसांत प्राथमिक शिक्षण विभागाकडून नियुक्तीचे वेळापत्रक जाहीर होणार आहे. प्रथम शिक्षकांच्या कागदपत्रांची पडताळणी केली जाईल. त्यानंतर समुपदेशनाद्वारे शाळांची नियुक्ती दिली जाईल. उपलब्ध शिक्षकांना तातडीने रुजू करून घेण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या. जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये ६० हजारांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

शिक्षक उपलब्ध झाल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यास मदत होणार आहे. उर्वरित १८५ रिक्त पदे दुसऱ्या टप्प्यात पवित्र पोर्टलच्या माध्यमातून भरण्याची शक्यता आहे.

## महाराष्ट्रातून अंमली पदार्थाचे सन २०२९ पर्यंत उच्चाटन

**मुंबई-**नशामुक्त भारत अभियानात महाराष्ट्र राज्याने पुढचे पाऊल टाकले आहे. सन २०२९ पर्यंत राज्यातून अंमली पदार्थांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी तयार करण्यात आलेले सर्वसमावेशक धोरण आज मंत्रिमंडळ बैठकीत मंजूर करण्यात आले. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. व्यापक जनजागृती आणि अंमली पदार्थांच्या विरोधात कठोर कारवाई असे हे धोरण असेल. यात शासनाच्या सर्वच विभागांचा सहभाग घेतला जाणार आहे. हे सर्वसमावेशक धोरण यशस्वी व्हावे यासाठी ग्राम पातळीपासून ते जिल्हा, विभाग आणि मंत्रालयीन स्तरापर्यंत जबाबदाऱ्यांचे वाटप करण्यात आले आहे. नशामुक्त महाराष्ट्र घडवण्यासाठी विविध विभागांच्या सहकार्याने अशाप्रकारे सर्वसमावेशक अभियान राबवणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य आहे.

## "३० वर्षांचा पल्ला, तपासणी अन् सल्ला' अभियानात आरोग्य तपासणी करुन पुढील गुंतागुंत टाळा

**-झेनिथ दोंतुला, मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.गोंदिया**

**-१ सप्टेंबर ते १० डिसेंबर दरम्यान राबविण्यात येणार अभियान**

**गोंदिया:-** महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या संकल्पनेतुन मतीस वर्षांचा पल्ला, तपासणी अन् सल्लाफ आरोग्य अभियान दि.१ सप्टेंबर ते १० डिसेंबर दरम्यान पुढील १०० दिवस राबबिण्यात येणार आहे. या अभियानाचा मुख्य उद्देश जिल्ह्यातील तीस वर्षांवरील सर्व महिला व पुरुषांमधील असंसर्गजन्य आजारांचे वेळीच निदान करून




त्यांच्यावर तातडीने उपचार करणे आहे. तरी गोंदियावासियांनी आपल्या जवळच्या शासकीय आरोग्य केंद्रात जाऊन आपल्या आरोग्याची मोफत तपासणी करुन घेण्याचे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी झेनिथ दोंतुला यांनी केले आहे.

सदर अभियानात ३० वर्ष व त्यावरील प्रत्येक महिला व पुरुषांची तपासणी न झालेल्या व्यक्तींची यादी व नोंदणी करणे, मधुमेह व उच्च रक्तदाबाचे लवकर निदान करणे, तोंडाचा, स्तनाचा व गर्भाशय मुखाचा कर्करोग यांची प्राथमिक तपासणी करुन संशयित रुग्णांना पुढील तपासणीसाठी संदर्भीत करणे तसेच तपासणीपासुन निदान, उपचार व पाठपुराव्यापर्यंतची माहिती पोर्टलवर अद्यावत करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभिजीत गोल्हार यांनी दिली आहे.

सदर अभियान जिल्ह्यातील गावपातळीवर राबविण्यात येणार असुन तीस वर्षावरील १०० टक्के लोकांची अंससर्गजन्य आजाराबाबत तपासणी करण्यात येणार आहे. "माझे गाव आरोग्य संपन्न गाव' यासाठी सदर अभियान महत्वपुर्ण असल्याचे सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अरविंदकुमार वाघमारे यांनी म्हटले आहे.

## २०२३-२४ ते २०२६-२७ या कालावधीत सिंचन प्रकल्पांमधून लक्षणीय वाढ

**गोंदिया :-** जिल्हा परिषदेच्या लघु पाटबंधारे विभागामार्फत मागील चार वर्षांत विविध योजनांच्या माध्यमातून सिंचन प्रकल्पांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. प्राप्त माहितीनुसार २०२३-२४ ते २०२६-२७ या कालावधीत निधीचा प्रभावी वापर करून सिंचन क्षमता निर्माण व पुनर्स्थापित करण्यावर भर देण्यात आला.



२०२३-२४ या वर्षात ?१,२१९.४९ लाख निधी प्राप्त झाला असून ?७६२.२८ लाख खर्च करण्यात आला. या वर्षात ८४ कामे पूर्ण झाली. त्यातून १७१६ हेक्टर नवीन सिंचन क्षमता निर्माण झाली, तर ६८६ हेक्टर सिंचन क्षमता पुनर्स्थापित करण्यात आली. एकूण २,४०२ हेक्टर सिंचन क्षमता उपलब्ध झाली.

२०२४-२५ मध्ये ?९६७.४५ लाख निधी प्राप्त झाला असून ?८५२.४२ लाख खर्च करण्यात आला. या वर्षात १,८३१ कामे पूर्ण झाली. त्यातून २,४६४ हेक्टर नवीन सिंचन क्षमता निर्माण झाली व १,००३.२० हेक्टर क्षमता पुनर्स्थापित करण्यात आली. एकूण ३,४६७.२० हेक्टर सिंचन क्षमता उपलब्ध झाली.

२०२५-२६ मध्ये ?१,५५५.२२ लाख निधी प्राप्त होऊन ?९९०.३६ लाख खर्च करण्यात आला. या वर्षात ५,१३६ कामे पूर्ण झाली. त्यातून ५,९६२ हेक्टर नवीन सिंचन क्षमता निर्माण झाली, तर २,३८४.८० हेक्टर क्षमता पुनर्स्थापित करण्यात आली. त्यामुळे एकूण ८,३४६.८० हेक्टर सिंचन क्षमता उपलब्ध झाली.

२०२६-२७ मध्ये आतापर्यंत ?२,६५७.२३ लाख निधी प्राप्त झाला असून ?१,८८८.३१ लाख खर्च करण्यात आला आहे. या कालावधीत २३८ कामे पूर्ण झाली. त्यातून ५,२३६ हेक्टर नवीन सिंचन क्षमता निर्माण झाली व २,०९४.४० हेक्टर सिंचन क्षमता पुनर्स्थापित करण्यात आली. एकूण ७,३३०.४० हेक्टर सिंचन क्षमता उपलब्ध झाली. तसेच २१७ कामे प्रगतीपथावर आहेत. एकूणच, चार वर्षांच्या कालावधीत सिंचन प्रकल्पांवर मोठ्या प्रमाणात खर्च करून हजारो हेक्टर क्षेत्रासाठी सिंचन क्षमता निर्माण व पुनर्स्थापित करण्यात आली आहे. यामुळे शेतकऱ्यांना सिंचनाची सुविधा वाढण्यास मदत झाली असून कृषी उत्पादन वाढीस चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

## नवजीवन विद्यालयातील १७ मुलींचे एचपीव्ही लसीकरण

**गोंदिया,**८ मार्च जागतिक महिला दिनापासुन देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे संकल्पनेतुन व सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या प्रेरणेतुन जिल्ह्यात सर्वत्र वय वर्ष १४ ते १५ वर्ष वयोगटातील मुलींसाठी मोफत एचपीव्ही लसीकरण करण्यात येत आहे. जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालय, बाई गंगाबाई स्त्री रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्रात मुलींसाठी मोफत लसीकरण सत्रे आयोजित करण्यात येत आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभिजीत गोल्हार, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अरविंदकुमार वाघमारे यांचे प्रत्यक्ष मार्गदर्शनात सर्व तालुका आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिकारी यांचे प्रत्यक्ष कार्यवाहीत गावपातळीवरील शासकीय आरोग्य संस्थेत लसीकरण केले जात आहे.

सडक अर्जुनी तालुका आरोग्य अधिकारी डॉ.प्रणित पाटील व प्राथमिक आरोग्य केंद्र चिखलीचे वैद्यकीय अधिकारी डॉ.वंदना घरोटे यांच्या संकल्पनेतुन प्राथमिक आरोग्य केंद्र चिखली अंतर्गत पळसगाव राका येथील मनवजीवन विद्यालयाफ्तील १७ मुलींचे ग्रामीण रुग्णालय सौंदड येथे दि.३१ ऑगस्ट रोजी यशस्वी एचपीव्ही लसीकरण करण्यात आले.

# २३ पैकी १२ आश्रशाळेत विद्यार्थ्यांसाठी बेडची सुविधाच नाही

**गोंदिया :-** गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा तालुक्यातील जपतलाई येथील आश्रम शाळेतील तीन विद्यार्थ्यांचा सर्पदंशाने मृत्यू झाल्याची घटना ९ ऑगस्ट रोजी घडली. या घटनेनंतर आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. शिवाय सुविधांची सुध्दा पोलखोल झाली आहे. गोंदिया जिल्ह्यात २३ आदिवासी आश्रमशाळा असून यापैकी आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांना झोपण्यासाठी बेडची सुविधाच नसल्याची बाब उघडकीस आली आहे. याची एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाने दखल घेतली असून या आश्रमशाळांना त्वरित बेडची सुविधा उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले आहे.



जपतलाई येथील घटनेनंतर आश्रमशाळेतील सोयी सुविधांचा पूर्णपणे बोजवारा उडाला असल्याची बाब पुढे आली आहे. विद्यार्थ्यांना सोयी उपलब्ध करुन देण्याच्या नावावर विद्यार्थी व त्यांचे पालक आणि प्रशासनाची दिशाभूल केली जात असल्याची बाब उघकीस आली आहे. या घटनेची शासनाने गांभीर्याने दखल घेतली आहे. तसेच आदिवासी विकास विभागाने सुध्दा सर्व आश्रमशाळा व्यवस्थापनांना पत्र देऊन आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याचे निर्देश दिले आहे. सर्पदंशाच्या घटना टाळण्यासाठी आश्रमशाळेच्या परिसरात प्रतिबंधात्मक उपाययोजना, थिमेंटसह कीटकनाशकांची फवारणी करण्याच्या सूचना केल्या आहे. याच पार्श्वभूमीवर देवरी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाचे प्रकल्प अधिकारी नितीन इसोकर यांनी त्यांच्या कार्यालया अंतर्गत येणाऱ्या २३ आदिवासी आश्रम शाळांना पत्र बजाविले आहे. तसेच सर्व आश्रमशाळा मुख्याध्यापक, संस्थाध्यक्ष यांची बैठक घेऊन आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांना सर्व सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे, विद्यार्थ्यांसाठी बेडची व्यवस्था करणे, सर्पदंशाच्या घटना टाळण्यासाठी उपाययोजना करण्याच्या सूचना केल्या. तसेच आश्रमशाळा इमारतींची स्थिती, आश्रमशाळेत स्वयंपाक तयार करण्यासाठी शाळेच्या इमारती लगत काड्या न ठेवण्याच्या सूचना केल्या. सोयी सुविधांचा अभाव आढळल्यास संबंधित आश्रमशाळा व्यवस्थापन, मुख्याध्यापकांवर कारवाई करण्याचा इशारा बैठकीत दिल्याची माहिती आहे.

## जाळीसह बदामाचे झाड लांबवले; "ग्रीन फाउंडेशन'च्या मोहिमेला गालबोट

**तिरोडा:-**शहर हिरवेगार आणि सुंदर बनवण्यासाठी अहोरात्र धडपडणाऱ्या सामाजिक संस्थांच्या प्रयत्नांवर चोरट्यांनी पाणी फेरल्याचा धक्कादायक प्रकार तिरोड्यात उघडकीस आला आहे. शहरातील अत्यंत गजबजलेल्या आणि पोलीस ठाण्याजवळील मुख्य चौकातून चोरट्यांनी चक्क लोखंडी जाळीसह ९ फूट उंचीचे बदामाचे झाडच लांबवले आहे. या घटनेमुळे शहराच्या हरित संकल्पनेला मोठा धक्का बसला असून नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

पर्यावरण संवर्धनासाठी ङ्ग्रीन फाउंडेशन तिरोडाफ ही संस्था गेल्या ८०४ दिवसांपासून दररोज उपक्रम राबवत आहे. संस्थेने आतापर्यंत शहरात सुमारे ३ हजारांहून अधिक झाडांची लागवड करून त्यांचे जतन केले आहे. याच मोहिमेअंतर्गत टीमने १६ ऑगस्ट रोजी पोलीस ठाण्याजवळील मुख्य चौकात, मिर्झा पान पॅलेसच्या बाजूला ९ फूट उंचीचे बदामाचे झाड लावून त्याच्या संरक्षणासाठी ८ फूट उंचीची टणक लोखंडी जाळी बसवली होती.

**पोलीस ठाण्याजवळच धाडस!**

२२ ऑगस्टच्या रात्री ११ ते २३ ऑगस्टच्या सकाळी ७ वाजेच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने हे झाड मुळासकट उखडून जाळीसह पळवून नेले. विशेष म्हणजे, पोलीस ठाण्याच्या अगदी हाकेच्या अंतरावर हा प्रकार घडल्याने चोरट्यांच्या धडसाबाबत आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

# भांडे विक्रेत्याचा मुलगा झाला लोको पायलट



**गोंदिया:-**जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रम करण्याची तयारी असेल तर प्रतिकूल परिस्थितीवर मात करून कोणतेही मोठे यश संपादन करता येते हे गोंदिया तालुक्यातील खातिया येथील २४ वर्षीय प्रतीक विकास डोंगरे याने सिद्ध करून दाखविले आहे. प्रतीकने असिस्टंट लोको पायलटची परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण केली असून लवकरच तो या पदावर रुजू होणार आहे. प्रतीकचे यश ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी आदर्श ठरले आहे. प्रतीकचे वडील गावोगावी फिरून भांडे विक्रीचा व्यवसाय करतात. आई निकिता डोंगरे या गृहिणी आहेत. मोठा भाऊ सध्या खासगी शाळेत शिकवितो. प्रतीकच्या घरची आर्थिक परिस्थिती प्रतिकूल असतानाही दोन्ही भावांनी शिक्षणाची कास सोडली नाही. तर आई-वडिलांनी सुद्धा स्वतःच्या पोटाला चिमटा घेऊन मुलांना शिक्षित करण्याचा संकल्प केला. मुलांच्या शिक्षणासाठी

काबाडकष्ट केले. तर मुलांनी सुद्धा आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवीत भरपूर अभ्यास करून यश संपादन केले. प्रतीकने लोको पायलट होण्याचे ध्येय मनाशी बाळगून २०२४ पासून सातत्याने तयारी सुरू केली. कठोर मेहनत, अभ्यास व चिकाटीच्या जोरावर त्याने आपल्या ध्येयाला गवसणी घातली. विशेष म्हणजे, त्याचे बीएससी अंतिम वर्षाचे शिक्षण सध्या सुरू आहे. प्रतीकने यापूर्वी २०२२ मध्ये एअर फोर्सची परीक्षा दिली होती. मात्र, अवघ्या दोन गुणांनी तो यशापासून दूर राहिला. त्यानंतर २०२३ मध्ये आरओडीच्या परीक्षेतही तीन गुणांनी त्याला अपयश आले. मात्र, या अपयशामुळे प्रतीक निराश झाला नाही. अपयश आले तरी मागे हटायचे नाही, जोपर्यंत ध्येय साध्य होत नाही तोपर्यंत प्रयत्न सुरूच ठेवायचे, असा निर्धार करून त्याने अभ्यास आणि परीक्षेची तयारी सुरू ठेवली. अखेर त्याच्या मेहनतीला यश आले आणि असिस्टंट लोको पायलटच्या पदावर त्याची निवड झाली. प्रतीकची यशोगाथ मअपयश ही यशाची पहिली पायरी आहे या उक्तीचे उत्तम उदाहरण ठरली आहे. दोन परीक्षांमध्ये अपयश मिळूनही त्याने हार मानली नाही. धैर्य, आत्मविश्वास आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांच्या जोरावर त्याने अखेर आपले स्वप्न साकार केले.

**गावकऱ्यांनी केला प्रतीकचा सत्कार**

प्रतीकच्या या उल्लेखनीय यशाबद्दल खातियाचे सरपंच ललित तावाडे, ग्रामपंचायत सदस्य सुरजलाल खोटेले, विजेंद्र मेश्राम यांच्यासह ग्रामस्थांनी त्याचा सत्कार करून त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून मिळिवलेले प्रतीकचे हे यश गावातील युवकांना परिस्थिती कशीही असो ध्येय निश्चित असेल आणि प्रयत्न सातत्यपूर्ण असतील तर यश नक्की मिळते असा प्रेरणादायी संदेश देणारे ठरले आहे

# पर्यटन क्षेत्राची जागा राखीव वन म्हणून घोषित करु नका



**नवेगावबांध:-**येथील पर्यटन क्षेत्र, सार्वजनिक वापराची जागा व स्मशानभूमीची जमीन राखीव वन म्हणून घोषित करण्याच्या विचाराधीन प्रस्तावामुळे स्थानिक नागरिक व पर्यटनावर होणाऱ्या परिणामासंदर्भात आ. राजकुमार बडोले यांच्या पुढाकाराने जिल्हाधिकारी कार्यालय येथे विशेष बैठक पार पडली.या बैठकीला सरपंच हिरा पंधरे, नवेगावबांध फाउंडेशनचे अध्यक्ष विजय डोये, सचिव रामदास बोरकर, किशोर तरोणे, तहसीलदार अनिरुद्ध कांबळे, वन्यजीव विभागाचे अतुल देवकर, पाटबंधारे विभागाचे अधिकारी, उपवनसंरक्षक आणि वन जमाबंदी अधिकारी उपस्थित होते.

ग्रामपंचायत नवेगावबांध व नवेगावबांध फाउंडेशनच्या विनंतीवरून आ. राजकुमार बडोले यांनी पुढाकार घेऊन प्रशासनाचे या गंभीर विषयाकडे लक्ष वेधले. प्रस्तावित गट राखीव वन घोषित झाल्यास नवेगावबांधच्या पर्यटन विकासाला आळा बसेल आणि स्थानिक रोजगारावर परिणाम होईल, अशी ठाम भूमिका या बैठकीत मांडण्यात आली.

सर्व्हे क्रमांक १०५६, १२६६/२, १२६७ व १२७३ मधील सुमारे ८०.६७ हेक्टर जमिनीचा यामध्ये समावेश आहे. यात गावातील स्मशानभूमी, ऐतिहासिक पर्यटनस्थळ, हिलटॉप गार्डन, लॉन हट, पाण्याची टाकी ऐतिहासिक शंकरपटाची जागा आणि मनोहर उद्यान यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या स्थळांचा समावेश आहे. बैठकीत सादर केलेल्या विषयांची गांभीर्याने दखल घेत जिल्हाधिकारी मंदार पत्की यांनी संबंधित स्थळांची व गटांची प्रत्यक्ष पाहणी करून त्यानंतरच पुढील निर्णय घेण्याचे निर्देश दिले आहेत.


## जिल्हा परिषद, गोंदिया
## ग्रामीण पाणी पुरवठा विभाग

### ई-निविदा सूचना क्रमांक ०२ (प्रथम वेळ) सन २०२६-२०२७

ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद गोंदिया व त्याअंतर्गत येत असलेले उपविभागकरिता वाहन मालकाकडून दर निश्चितीकरिता www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन ई-निविदा आमंत्रित करित आहे.

| अ.क्र. | कामाचे स्वरुप | वाहनांची संख्या | वाहनाचा प्रकार | निविदा फॉर्मची किंमत रुपये | बयाना फी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जि.प.गोंदिया व त्या अंतर्गत येत असलेले सर्व उपविभाग या कार्यालयाकरिता एकुण ५ वाहन भाड्याने घेणेबाबत. | सध्या वाहनाची आवश्यकता ०५ असून कार्यालयाचे आवश्यकतेनुसार वाहन भाडे तत्वावर घेणे आहे. | जीप,टाटा सुमो,स्विफट डीझयर, इनोव्हा, झायलो बोलेरो,स्कॉरपिओ, व्हरना, होंडा सिटी,टवेरा व इतर ११५० सीसी पेक्षा जास्त वाहने (चारचाकी) | ५००/- + जीएसटी ९०/- असे एकुण ५९०/- | १०,०००/- |

निविदेच्या अटी/शर्ती व सविस्तर माहिती महाराष्ट्र शासनाच्या इलेक्ट्रानिक निविदा व्यवस्थापन प्रणालीचे web.https;//.mahatenders.gov.in/nicgep/app या वेबसाईटवर दिनांक -------------- नंतर पहावयास मिळेल.

(दिप :- कामाची निविदा केवळ ई-निविदा पद्धतीने सादर करावयाची आहे.)

क्र.संमावज/नाग/३९९/२०२६

**कार्यकारी अभियंता**
**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग**
**जिल्हा परिषद, गोंदिया**

# आरोग्य निर्देशांक रँकिंग: गोंदिया जिल्ह्याची राज्यात गरुडभरारी;डीएचओ मानांकनात पटकावला पहिला क्रमांक




**गोंदिया:**-राज्य शासनाच्या आरोग्य विभागाकडून जाहीर करण्यात आलेल्या ताज्या आरोग्य निर्देशांक रँकिंगमध्ये गोंदिया जिल्ह्याने उत्कृष्ट कामगिरी करत महाराष्ट्रात प्रथम स्थान पटकावले आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी (उक्रज) मानांकनात गोंदिया जिल्हा परिषद आरोग्य विभागाने तब्बल ४६.५७ गुण मिळवून राज्यात अव्वल क्रमांक मिळवला.पुणे येथे आयोजित विशेष सोहळ्यात आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे संचालक संजय काटकर यांच्या हस्ते गोंदियाचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभिजीत गोल्हार यांचा विशेष सत्कार करण्यात आला.रँकिंगमधील टॉप ५ जिल्हेराज्यस्तरावर पहिल्या तिमाहीतील गुणांच्या आधारे जाहीर करण्यात आलेली

| क्रमांक | जिल्हा | प्राप्त गुण |
|---|---|---|
| १ | गोंदिया | ४६.५७ |
| २ | नागपूर | ४५.७९ |
| ३ | वर्धा | ४५.१७ |
| ४ | अकोला | ४४.३९ |
| ५ | गडचिरोली | ४४.१४ |

क्रमवारी खालीलप्रमाणे आहे.

सांघिक कामगिरीचे यशमाता व बाल आरोग्य, कुटुंब नियोजन, नियमित व विशेष लसीकरण मोहिमा, ठउक ऑनलाइन पोर्टल नोंदणी, क्षयरोग नियंत्रण आणि आयुष्मान भारत आरोग्यवर्धिनी केंद्रांमार्फत दिलेल्या मोफत आरोग्य सेवा अशा विविध राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय आरोग्य कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी जिल्ह्यात करण्यात आली.

जिल्ह्यातील ४५ प्राथमिक आरोग्य केंद्रे, १ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, २६३ आरोग्य उपकेंद्रे, ४ आपला दवाखाना

**"हा बहुमान गोंदिया जिल्ह्यातील सर्व अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सेवक-सेविका, आशा स्वयंसेविका आणि डेटा एंट्री ऑपरेटर्सच्या सांघिक मेहनतीचा परिणाम आहे. आगामी काळात लोकसहभागातून अधिक प्रभावी आणि दर्जात्मक आरोग्य सेवा देण्यावर आमचा भर राहील."**

**झेनिथ दोंतुला, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गोंदिया**

आणि १७ नागरी आरोग्यवर्धिनी उपकेंद्रांच्या माध्यमातून आरोग्य यंत्रणेने हे यश संपादन केले आहे.आदिवासी आणि नक्षलग्रस्त भाग, सीमावर्ती भौगोलिक रचना आणि कर्मचाऱ्यांची रिक्त पदे अशी आव्हाने असतानाही गोंदिया आरोग्य विभागाने मिळवलेले हे यश संपूर्ण नागपूर विभागासाठी भूषणावह ठरले आहे.

# पालकमंत्री इंद्रनील नाईक यांचा जिल्हा दौरा कार्यक्रम

**गोंदिया** : उद्योग, सार्वजनिक बांधकाम, उच्च व तंत्र शिक्षण, आदिवासी विकास, पर्यटन, मृद व जलसंधारण विभागाचे राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री इंद्रनील नाईक हे दि.२ सप्टेंबर २०२६ रोजी गोंदिया जिल्ह्याचे दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. सकाळी ९ वाजता लोणारा, नागपूर येथून मोटारीने गोंदियाकडे प्रयाण. सकाळी ११.३० वाजता गोंदिया येथे आगमन व स्व. सुखदेव अग्रवाल (स्वतंत्रता संग्राम सेनानी - माजी आमदार) यांच्या १२५ व्या जयंती महोत्सवानिमित्त श्री गुरुनानक स्कुल ग्राऊंड, गोंदिया येथे आयोजित मुख्य जयंती समारंभास उपस्थिती. दुपारी १ वाजता खासदार प्रफुल पटेल यांच्या जनसंपर्क कार्यालयास भेट. तदनंतर सोईनुसार गोंदिया येथून मोटारीने पुसद, जि.यवतमाळकडे प्रयाण करतील.

# सातबारावर चढविलेली बोगस नावे कमी करण्यासाठी शेतकऱ्याची पायपीट,आत्मदहनाचा इशारा

**गोंदिया** :- तिरोडा तालुक्यातील घोगरा येथील शेतकरी शामराव यादवराव खळोदे यांच्या वडिलोपार्जित जमिनीवर यंत्रणेच्या चुकीमुळे चार व्यक्तींची नावे चढविण्यात आली. सातबारावर कुटूंबाव्यतिरिक्त असलेल्या त्या व्यक्तींची नावे कशी चढविण्यात आली, याबाबत विचारणा केली असता महसूल यंत्रणेचे अधिकारी उलट शिरजोरी करून त्रास देत आहेत. या प्रकाराला संतापून शेतकरी शामराव खळोदे यांनी कुटूंबासह आत्मदहनाचा इशारा दिला आहे. यामुळे सुड घेणाऱ्या यंत्रणेतील अधिकारी-कर्मचाऱ्यांवर त्वरित कारवाई होणार काय? याकडेही लक्ष लागले आहे.

वडिलोपार्जित शेतीच्या सातबारावर वारसाने नसलेल्यांची नावे चढविण्यात आल्याचा आरोप करीत ती नावे कमी करण्यासाठी एका शेतकऱ्याची गेल्या चार वर्षांपासून तलाठी, उपविभागीय अधिकारी व जिल्हाधिकारी कार्यालयात पायपीट सुरू आहे, न्याय न मिळाल्याने त्यांनी आता ग्रेट महसूलमंत्र्यांकडे धाव घेतल्याची माहिती घोगरा येथील शेतकरी शामराव खळोदे यांनी आयोजित पत्र परिषदेत दिली.तसेच दिलेल्या माहितीनुसार वडिलोपार्जित शेतजमीन चार गटात आहे. त्यात १८२,१८७,१७६, ११ या गटांचा समावेश आहे. या चारही गटांवर वारसान हक्क म्हणून



आमच्या व्यतिरिक्त मालन वासुदेव आगे, केशर तेजराम उपवास, अन्नु ग्यानीराम नागपुरे, बिरन गोपाळ सांडील यांचे नाव चढविण्यात आले आहे. ही नावे सातबारावर कशी का आली? याबाबत चौकशी केली असता तलाठी यांनी फेरफारनुसार झाले आहेत, असे सांगितले. ही नावे कमी करण्यासाठी त्यांनी काही कागदपत्रांची पुर्तता करण्याचा सल्ला दिला. त्यानुरूप सदर व्यक्तींचा शोध घेतला असता नात्यागात्यातील तर सोडाच गावात किंवा परिसरातही राहत असल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे ही नाव चढविण्यात कशी आली? असा प्रश्न निर्माण झाला. असे असतानाही मंडळ अधिकारी, तहसीलदार आणि उपविभागीय अधिकारीपर्यत ही नावे कमी करण्याची फिर्याद मांडली. मात्र गेल्या चार वर्षांपासून टाळाटाळ केली जात आहे. तलाठी, मंडळ अधिकारी, तहसीलदार हे उलट शिरजोरी करीत आहेत, कशी नावे कमी होतात? अशी धमकीवजा इशारा महिला तलाठ्यापासून ते तहसिलदारापर्यंत बोलत असून मंडळ अधिकारी हे आपल्या कार्यालयातील एका खासगी व्यक्तीमार्फत पैशाची मागणी करीत असल्याचेही खळोदे यांनी म्हटले आहे.

या प्रकाराने शेतकरी शामराव खळोदे यांनी आपण कंटाळलो असून येत्या ८ ते १५ दिवसात तिरोडा तहसिल कार्यालयातील महसूल यंत्रणेकडून अन्याय दूर करण्यात आला नाही तर आत्मदहन करण्याचे पाऊल उचलणार? असा इशारा शेतकरी खळोदे यांनी देत आपल्या मृत्यूला महिला तलाठी,मंडळ अधिकारी व तिरोड्याचे तहसिलदार हे सर्वस्वी जबाबदार राहणार असल्याचे पत्रपरिषदेत सांगितले.

# घराला भीषण आग; संसार जळून खाक! जि. प. सदस्य किरणकुमार पारधी यांच्याकडून १० हजारांची तातडीची मदत

**तिरोडा:-** तालुक्यातील घोगरा पाटीलटोला येथे काल रात्री सुमारे ९.१५ वाजताच्या सुमारास अचानक लागलेल्या भीषण आगीत श्रीमती लीलाबाई प्रकाशजी कटनकर (विधवा) आणि त्यांचा मुलगा अमोल कटनकर यांच्या घरातील संपूर्ण संसार जळून खाक झाला. या दुर्घटनेत घरातील अन्नधान्य, कपडे, जीवनावश्यक साहित्य, महत्त्वाची कागदपत्रे आणि सुमारे ५० हजार रुपयांची रोख रक्कम पूर्णपणे जळून नष्ट झाली आहे. मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या कटनकर कुटुंबावर या अचानक आलेल्या आपत्तीमुळे मोठे संकट ओढवले आहे.



घटनेची माहिती मिळताच जिल्हा परिषद सदस्य किरणकुमार पारधी यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी तहसीलदार नारायण ठाकरे यांच्याशी संपर्क साधून महसूल विभागाची टीम, तलाठी, कोतवाल तसेच महावितरणचे कनिष्ठ अभियंता मेश्राम व त्यांच्या पथकाला घटनास्थळी पाचारण केले. संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून नुकसानीचा पंचनामा केला.

घर पूर्णपणे जळाल्याने कुटुंबासमोर निवारा आणि दैनंदिन उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन तहसीलदारांनी स्वस्त धान्य दुकानातून तातडीने अन्नधान्य उपलब्ध करून देण्याचे तसेच शासकीय नियमानुसार सढळ हस्ते आर्थिक मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले.यावेळी सरपंच प्रीतीबाई भांडारकर, पप्पू भांडारकर, अशोक भांडारकर, अरुण खरोदे, ग्रामविकास अधिकारी प्रमोद, महसूल विभागाचे कर्मचारी, पोलीस पाटील, महावितरणचे कर्मचारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. संकटसमयी जि. प. सदस्य किरणकुमार पारधी यांनी दाखवलेली तत्परता आणि संवेदनशीलतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

**जि. प.सदस्यांकडून तातडीची आर्थिक मदत व निवाऱ्याची सोय**

शासकीय मदत मिळेपर्यंत कटनकर कुटुंबाला तात्पुरता आधार मिळावा म्हणून जि. प. सदस्य किरणकुमार पारधी यांनी स्वतःच्या पुढाकारातून १० हजार रुपयांची तातडीची रोख मदत सुपूर्द केली. याशिवाय कुटुंबाला तात्पुरता निवारा मिळावा यासाठी मआदिवासी नवनिर्मित भवनातफ त्यांच्या राहण्याची सोय करण्याबाबत प्रशासनाला सूचना दिल्या.

या प्रसंगी बोलताना किरणकुमार पारधी म्हणाले की, संकटग्रस्त कुटुंबाला केवळ आश्वासन न देता प्रत्यक्ष मदत करणे आणि शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून देणे ही माझी प्राथमिक जबाबदारी आहे. या पीडित कुटुंबाला प्रशासकीय पातळीवरून जास्तीत जास्त आर्थिक मदत, धान्य व पक्का निवारा मिळेपर्यंत माझा सातत्याने पाठपुरावा सुरू राहील.

# युनियन बँक चौकातील नालीवर अतिक्रमणामुळे नागरिक त्रस्त




**तिरोडा :-** शहरातील युनियन बँक चौक परिसरातील नालीवर अतिक्रमण झाल्याने नाली पूर्णपणे बुजली आहे. यामुळे पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यास मोठा अडथळा निर्माण झाला असून नागरिक व स्थानिक व्यापारी कमालीचे त्रस्त झाले आहेत.

युनियन बँकेच्या समोरील लेआऊटधारकांनी नालीसाठी सोडलेल्या जागेवर अतिक्रमण करून इमारत उभारण्यात आली आहे. त्यामुळे पावसाचे पाणी तुंबून बन्नाडे क्लॉथ स्टोअर्स, भरणे ज्वेलर्स, महालक्ष्मी हार्डवेअर, शेतकरी कृषी केंद्र आणि युनियन बँकेत पाणी शिरत असून व्यापाऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. जिल्हापरिषद बांधकाम विभागाने रस्त्याच्या कडेने नाली बांधली आहे, परंतु रस्त्यावरील पाणी नालीत जाण्यासाठी जागोजागी छिद्रेच पाडण्यात आलेली नाहीत. विशेष म्हणजे,आगाशे हार्डवेअरजवळ सर्व पाणी जमा होते, मात्र तेथून पुढे पाण्याचा मार्ग पूर्णपणे बंद आहे. तेथे नाली बुजलेली असून इलेक्ट्रिक केबल्स पडल्यामुळेधोकादायक परिस्थिती निर्माण झाली आहे. पाण्याचा निचरा होत नसल्याने संपूर्ण रस्त्यालाच नाल्याचे स्वरूप प्राप्त झाले असून सर्व पाणी युनियन बँक चौकात साचून नागरिकांच्या घरात व दुकानांमध्ये शिरत आहे. नगरपरिषद प्रशासनाने या समस्येकडे त्वरित लक्ष देऊन नालीवरील अतिक्रमण हटवावे, नालीला जागोजागी छिद्रे पाडावीत आणि आगाशे हार्डवेअरजवळील बुजलेली नाली खुली करून पाण्याचा निचरा सुरळीत करावा, अशी तीव्र मागणी परिसरातील नागरिकांमधून होत आहे.

# महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेसाठी २५ सप्टेंबरपर्यंत ऑनलाईन प्रवेशिका सादर करण्याचे आवाहन

**गोंदिया :** शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने दि.१६ नोव्हेंबर २०२६ पासून सुरु होणाऱ्या हौशी मराठी, हिंदी, संगीत व संस्कृत राज्य नाट्य स्पर्धांसाठी तसेच बालनाट्य स्पर्धा व दिव्यांग बालनाट्य स्पर्धांसाठी नाट्य संस्थांकडून दि.२५ सप्टेंबर २०२६ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने प्रवेशिका मागविण्यात येत असल्याची माहिती सांस्कृतिक कार्य संचालक प्रशांत खेडेकर यांनी दिली. सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य नाट्य स्पर्धा पार पडणार असल्याचे श्री. खेडेकर यांनी नमूद केले आहे. २३ व्या महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धेची प्राथमिक फेरी डिसेंबर २०२६ पासून विविध १० केंद्रांवर तर ६५ व्या हौशी हिंदी, संगीत व संस्कृत नाट्य स्पर्धेची अंतिमफेरी प्रत्येकी एका केंद्रावर डिसेंबर २०२६ पासून आयोजित करण्यात येणार आहे.

नोंदणीकृत हौशी नाट्य संस्थांना तसेच गतवर्षी राज्यनाट्य स्पर्धेत सहभागी झालेल्या नाट्य संस्थांना स्पर्धेसाठी विहित नमुन्यातील प्रवेशिका, नियम संचालनालयाच्या `बसाईटवर ऑनलाईन उपलब्ध होतील. आवश्यक त्या कागदपत्रासह प्रवेशिका दि.२५ सप्टेंबर २०२६ पर्यंत ऑनलाईन सादर कराव्यात.

विहित मुदतीनंतर कोणत्याही परिस्थितीत प्रवेशिका स्विकारल्या जाणार नाहीत. प्रवेशिकेसोबत आवश्यक असणारी कागदपत्रे जोडलेली नसल्यास किंवा संपूर्ण तपशिल भरला नसल्यास ऑनलाईन प्रवेशिका भरता येणार नाही.

स्पर्धेसाठी संस्थेची निवड झाल्यानंतर संस्थेने शासनाने निश्चित केलेल्या केंद्रावर व दिलेल्या तारखेस प्रयोग सादर केला नाही, तर त्यांची प्रवेशिकेसोबत भरलेली अनामत रक्कम शासकीय कोषागारात जमा करण्यात येईल. नाट्यस्पर्धेकरीता संस्थांना शासन नियम बंधनकारक राहतील. नियमांचे उल्लंघन केल्यास संस्थेला अपात्र ठरविण्यात येईल.

# नगरपंचायतीने आधुनिक यंत्रणा उभारावी-आमदार राजकुमार बडोले



**सडक अर्जुनी:**-सडक अर्जुनी नगरपंचायतीच्या माध्यमातून नागरिकांना अधिक चांगल्या व तत्पर सेवा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने नव्याने सेवेत दाखल करण्यात आलेल्या मस्वर्गरथफ तसेच मसेप्टिक टँक सक्शन वाहनाचेफ (शोषण टँकर) लोकार्पण आमदार इंजि. राजकुमार बडोले यांच्या शुभहस्ते २७ ऑगस्ट रोजी उत्साहात पार पडले.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना आमदार राजकुमार बडोले म्हणाले की, ङ्गस्वच्छता ही केवळ नगरपंचायतीची जबाबदारी नसून ती प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. नागरिकांना स्वच्छ, सुंदर व आरोग्यदायी वातावरण मिळावे यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी आधुनिक साधनसामग्रीचा प्रभावी वापर करणे अत्यंत आवश्यक आहे.ङ्घ

ते पुढे म्हणाले की, स्वर्गरथामुळे अंत्यसंस्काराच्या अत्यंत संवेदनशील वेळी नागरिकांना मोठी सुविधा उपलब्ध होणार आहे. तसेच सेप्टिक टँक सक्शन वाहनामुळे शहरातील सांडपाणी व सेप्टिक टँक स्वच्छतेची समस्या अधिक सुलभतेने सोडवता येईल. नगरपंचायतीने उपलब्ध करून दिलेल्या या सुविधांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांना पारदर्शक व योग्य पद्धतीने मिळवून द्यावा, असे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले.

**नियोजनबद्ध विकासासाठी समन्वयाची गरज**

स्वच्छता, पाणीपुरवठा, आरोग्य, रस्ते आणि इतर मूलभूत सुविधांना प्राधान्य देत सडक अर्जुनी शहराचा नियोजनबद्ध विकास करण्यासाठी लोकप्रतिनिधी व प्रशासनाने समन्वयाने काम करावे, तसेच नागरिकांनीही शहर स्वच्छ राखण्यासाठी नगरपंचायतीला पूर्ण सहकार्य करावे, असे आवाहन आमदार बडोले यांनी केले.

**नागरिकांची मोठी अडचण दूर**

स्वर्गरथ व सेप्टिक टँक सक्शन वाहन सेवेत दाखल झाल्यामुळे सडक अर्जुनी परिसरातील नागरिकांना अंत्यविधीच्या वेळी आणि सांडपाणी व्यवस्थापनासाठी मोठी मदत होणार आहे. या नवीन वाहनांमुळे नगरपंचायतीच्या स्वच्छता व्यवस्थेला अधिक गती मिळण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

**प्रमुख मान्यवरांची उपस्थिती**

या लोकार्पण सोहळ्याला नगरपंचायत अध्यक्ष तेजराम मडावी, उपाध्यक्ष वंदनाताई डोंगरवार, पंचायत समिती सभापती चेतन वडगाये, नगरपंचायत सभापती शाहिस्ताताई शेख, कमलादेवी अग्रवाल, सायमाताई शेख, नगरपंचायत मुख्याधिकारी सारंग खांडेकर, नगरसेवक देवचंद तरोने, महेंद्र वंजारी, अंकित भेंडारकर, असलेश अंबादे, गोपीचंद खेडकर, विशाल शहारे, राजकुमार हेडाऊ, नगरसेविका शशिकलाताई टेम्भूरने, दीक्षाताई भगत, रजनी परिहार, रेणू अग्रवाल तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती डॉ. अविनाश काशिवार, नगरपंचायत कर्मचारी, स्थानिक पत्रकार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कृउबास सभापती- उपसभापतींची निवड ७ सप्टेंबरला

**गोंदिया :-** गोंदिया कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती भाऊराव उके व उपसभापती राजकुमार (पप्पु) पटले या दोघांविरूध्द अविश्वास प्रस्ताव १८ विरूध्द १५ मताने पारीत करण्यात आला. यानंतर सभापती व उपसभापती पदाची माळ कुणाच्या गळ्यात पडणार, या बाबीची उत्कंठा लागली आहे. त्यातच जिल्हाधिकारी यांच्या सुचनेवरून जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडून दोन्ही पदाधिकाऱ्यांच्या निवडीसाठी ७सप्टेंबर रोजी सभा बोलविण्यात आली आहे. त्यामुळे नवे पदाधिकारी कोण? याकडे लक्ष लागले आहे.

जिल्ह्यात सर्वात जास्त उत्पन्न देणारी कृषी उत्पन्न बाजार समिती म्हणजे गोंदिया येथील संस्था आहे. त्यामुळे सहकार क्षेत्रात गोंदिया कृषी उत्पन्न बाजार समितीच्या राजकारणाकडे




जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. तीन वर्षापूर्वी झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत चाबी संघटन व काँग्रेसने संयुक्तरित्या सत्ता काबीज केली. दरम्यान अडीच-अडीच वर्षाच्या फार्म्युल्यातून सभापती-उपसभापती निवडण्यात आले होते. मात्र अडीच वर्ष लोटूनही सभापती भाऊराव उके व उपसभापती राजकुमार पटले या दोघांना खुर्चीचा मोह सुटला नाही. परिणामी १८ पैकी १५ संचालकांनी या दोन्ही पदाधिकाऱ्यांविरूध्द अविश्वास प्रस्ताव पारीत करून त्यांच्या पायउतारावर शिक्कामोर्तब केले. त्यामुळे उर्वरित दीड वर्षाच्या कार्यकाळासाठी सभापती व उपसभापती पदाची माळ कुणाच्या गळ्यात पडणार? याकडे लक्ष लागले आहे. येत्या ७ सप्टेंबर रोजी दोन्ही पदाच्या निवडीसाठी संचालक मंडळाची सभा बोलविण्यात आली आहे. अद्यापपर्यत संचालक मंडळामध्ये पदाधिकाऱ्यांच्या निवडीसाठी कसलेही मंथन झाले नसल्याचे विश्वसनिय सुत्राकडून माहिती आहे.

# आदिवासी वसतिगृहांच्या खासगीकरणाचा आरोप; शासन म्हणते, 'मालकी आमचीच!'

## वसतिगृहांतील विद्यार्थ्यांसाठी खासगी संस्थेचे १८ उपक्रम



**गडचिरोली:-** आदिवासी विकास विभागाच्या शासकीय विद्यार्थी वसतिगृहांच्या खासगीकरणाचा आरोप होत असतानाच शासनाने या आरोपांचे खंडन केले आहे. वसतिगृहांची मालकी, प्रशासकीय नियंत्रण आणि व्यवस्थापनाचे अधिकार शासनाकडेच कायम असून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एका संस्थेसोबत केवळ सामंजस्य करार करण्यात आल्याचे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भामरागड यांनी स्पष्ट केले आहे.

राज्यात आदिवासी विकास विभागाची ४९० शासकीय वसतिगृहे असून, त्यांची विद्यार्थी क्षमता तब्बल ६५ हजार ८४ आहे या विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत व्यक्तिमत्व विकास, करिअर मार्गदर्शन, स्पर्धा परीक्षा, कौशल्य विकास आणि विविध शासकीय योजनांची

माहिती मिळावी, या उद्देशाने नागपूर येथील कै. लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्थेसोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे.

हा करार १५ ऑगस्ट २०२५ ते १५ ऑगस्ट २०२८ या तीन वर्षाच्या कालावधीसाठी आहे. संस्थेकडून कोणताही शासकीय मोबदला न घेता विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबविले जाणार आहेत. मात्र, या करारामुळे संस्थेला वसतिगृहांची इमारत, मालमत्ता, दैनंदिन प्रशासन किंवा व्यवस्थापनाचे कोणतेही अधिकार मिळालेले नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

या उपक्रमांत उद्योजकता विकास, करिअर मार्गदर्शन, व्यक्तिमत्व विकास, शिष्यवृत्ती व शैक्षणिक योजनांची माहिती, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, स्पोकन इंग्लिश, व्यसनमुक्ती जनजागृती, आर्थिक साक्षरता आणि संविधान अभ्यास यांसह १८ उपक्रमांचा समावेश आहे.

**नेमके काय होणार ?**

राज्यातील ४९० शासकीय वसतिगृहे शासनाच्या नियंत्रणाखालीच राहणार. ६५ हजार ८४ विद्यार्थ्यांना उपक्रमांचा लाभ. खासगी संस्थेकडून १८ प्रकारचे उपक्रम मोफत. वसतिगृहांची मालकी व प्रशासकीय अधिकार शासनाकडेच. सामंजस्य कराराचा कालावधी १५ ऑगस्ट २०२५ ते १५ ऑगस्ट २०२८. मुलींच्या वसतिगृहात महिला प्रशिक्षक व महिला गृहपालांच्या उपस्थितीत उपक्रम.

# भडंग्यात दारूबंदीचा ऐतिहासिक एल्गार! हजारो ग्रामस्थांचा रस्त्यावर उतरून निर्धार

## महिला, विद्यार्थी व युवकांचा अभूतपूर्व सहभाग



**गोरेगाव:-** तालुक्यातील ग्राम भडंगा येथे दारूबंदीच्या मागणीसाठी भव्य महारॅली काढून ग्रामस्थांनी सामाजिक एकजुटीचे आणि व्यसनमुक्त भविष्यासाठीच्या सामूहिक निर्धाराचे दर्शन घडवले. ग्रामपंचायत कार्यालयापासून निघालेल्या या रॅलीत हजारो महिला, युवक, विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिक हातात जनजागृतीपर फलक घेऊन रस्त्यावर उतरल्याने संपूर्ण गाव दारूबंदीच्या घोषणांनी दुमदुमून गेले.

दारूच्या व्यसनामुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होत असून आर्थिक व कौटुंबिक संकटे उभी राहत आहेत. यावर आळा घालण्यासाठी गावातील तरुण पिढीला व्यसनापासून वाचवण्याचा निर्धार करण्यात आला. महारॅलीदरम्यान अवैध दारूविक्री करणाऱ्यांच्या घरासमोर घोषणाबाजी करून दारूविक्री तात्काळ बंद करण्याचा इशारा देण्यात आला. रॅलीच्या एक दिवस आधी गोरेगाव पोलीस ठाण्यात निवेदन देऊन कायदेशीर कारवाईची मागणीही करण्यात आली आहे. या जनजागृती मोहिमेत दारूबंदी समितीचे अध्यक्ष नरेंद्र खोब्रागडे, सरपंच अतुल मोटघरे, उपसरपंच बाबुलाल मस्करे, तंटामुक्ती अध्यक्ष रवींद्र रहांगडाले, उज्ज्वल राऊत, रेवचंद कवास, बाळकृष्ण मेश्राम, प्रीतमलाल नंदेश्वर, लोकचंद शरणागत, स्वाती टेंभूर्णीकर, पिंकी मंडिये, अलका राऊत, ललिता लिल्हारे, प्रमिला भोयर, भामेश्वरी पटले, पोलीस पाटील सीमाताई नंदेश्वर यांच्यासह सर्व ग्रामपंचायत सदस्य, शिक्षक, विद्यार्थी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गोंदियात तृतीयपंथीयांना मिळणार रेशनकार्ड,घरकुल अन.. बरंच काही

**गोंदिया** :- सामाजिक उपेक्षेच्या सावटातून तृतीयपंथीयांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी गोंदिया जिल्हा प्रशासनाने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. तृतीयपंथी व्यक्ती (हक्कांचे संरक्षण) अधिनियम, २०१९ व नियम २०२०ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हास्तरीय तक्रार निवारण समितीची बैठक गुरुवारी (२७ ऑगस्ट) रोजी गोंदिया जिल्हाधिकारी मंदार पत्की यांच्या अध्यक्षतेखाली झाली. बैठकीत तृतीयपंथीयांना ओळखपत्र व प्रमाणपत्र देण्याबरोबरच रेशनकार्ड, घरकुल आणि अन्य शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

तृतीयपंथी व्यक्तींना कायद्याने निश्चित ओळख आणि सामाजिक स्थान मिळावे, त्यांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण व्हावे आणि आर्थिक-सामाजिक विकासाला चालना मिळावी, यासाठी प्रशासनाकडून विविध उपाययोजना राबविण्याचे निश्चित करण्यात आले. यासाठी गोंदिया जिल्ह्या-



तील तृतीयपंथी व्यक्तींचे सर्वेक्षण करून त्यांची शासकीय नोंदणी करण्यावरही भर देण्यात येणार आहे.

जिल्हाधिकारी यांच्या स्वाक्षरीचे ओळखपत्र व प्रमाणपत्र देण्यात आलेल्या तृतीयपंथी व्यक्तींचे त्यानंतर रेशनकार्ड तयार करून वाटप करण्यात आल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. त्यामुळे ओळख आणि अन्नसुरक्षेचा महत्त्वाचा दुवा जोडला जाणार आहे.

समाज कल्याण आयुक्त, पुणे यांच्या २३ एप्रिल २०२६ रोजीच्या पत्रानुसार तृतीयपंथी हक्कांचे संरक्षण व कल्याण योजनेंतर्गत जिल्ह्यात शिबिरे आणि विविध उपक्रम आयोजित करण्याबाबतही चर्चा झाली. भूखंडासह घरकुल, विविध शासकीय सुविधा आणि कल्याणकारी योजनांचा लाभ पात्र व्यक्तींना मिळवून देण्यासाठी प्रशासन समन्वयाने कार्य करणार आहे.

गोंदिया जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आलेल्या बैठकीस निवासी जिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहेरे, सहायक आयुक्त समाज कल्याण किशोर भोयर, समिती सदस्य तथा मैत्री संस्थेच्या पौर्णिमा दीपक नागदेवे, तृतीयपंथी समाजाच्या प्रमुख निशा गुरु कलीनायका यांच्यासह संबंधित अधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते.